# जातकयज्ञ

**दोन अंकी पौराणिक संगीत नाटक**

**Mythological Opera**


लेखक

**अनिल सहस्त्रबुद्धे**



आनंदोत्सव

प्रकाशन मंच

प्रकाशक

चॅरिटेबल ट्रस्ट, अहमदनगर

महाराष्ट्र, भारत

**जातकयज्ञ (दोन अंकी पौराणिक संगीत नाटक)**

**JATAKYADNYA (Mythological Opera)**

**लेखक : अनिल सहस्रबुद्धे**

दूरध्वनी : (०२४१) २४२४१६७

भ्र.भा. : ९८८१५००९४२

संकेतस्थळ : **www.anilsahasrabuddhe.in**

Email- usahasrabuddhe@gmail.com

**© सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे**

**प्रकाशक**

आनंदोत्सव प्रकाशन मंच

आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट

'आई', समर्थनगर, श्रीराम चौक, पाईपलाईन रोड

अहमदनगर, महाराष्ट्र, भारत. ४१४००३ फोन : (०२४१) २४२४१६७

**प्रथमावृत्ती :** जानेवारी २०२१

**टाईपसेटींग :**

कुलकर्णी टाईपसेटर्स, श्रीपाद कुलकर्णी, अहमदनगर

मो. ९८५०२३२८९०

**मुद्रक :** मळगंगा ऑफसेट, अहमदनगर

**मुखपृष्ठ :** विराज बिज्जा, अहमदनगर

**मूल्य :** १००/-

**विशेष निवेदन :** 'आनंदोत्सव'प्रकाशन मंच केवळ, प्रकाशनार्थ मंच, विनामूल्य सेवा उपलब्ध करून देतो. ग्रंथनिर्मिती, वितरण, आयव्यय याशी आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टचा कोणताही, कोणत्याही प्रकारे संबंध नाही.

सदर ग्रंथ निर्मितीचा संपूर्ण खर्च अगस्त्यभक्तांनी केला आहे. लेखकाने, ग्रंथ विक्रीतून उत्पन्न मिळाल्यास, अगस्त्यचरणी अर्पण करण्याचा संकल्प केला आहे.

या पुस्तकातील मतांशी प्रकाशन मंच सहमत असेलच असे नाही.

**सौ. उषास...**

# प्रथम प्रयोग सादरकर्ते

दिग्दर्शन
संगीत
१)
२)
३)

पार्श्वसूचक
संगीत
प्रकाशयोजना
नेपथ्य
प्रसिद्धी



# जातकयज्ञ

## दोन अंकी पौराणिक संगीत नाटक

# नांदी

विश्वाच्या ह्या रंगभूमीवरी ।
शिवशिवा लीला रंगत राहो ।।
तया कृपेने रंगमंच हा
रसिकांनाही मुग्ध करो ।।धृ।।
विघ्नहराला वंदन करूनी ।
नाट्यरंगी रंगत जावो ।।
रसिक देवता प्रसन्न होऊनी ।
आनंदाने गगनभरो ।।१।।
कलाक्रीडेला शरण हे साधक ।
संगीत ही अभिनय बहरो ।।
कथा मांडली तव दरबारी ।
यशदायक हा उत्सव हो ।।२।।
अज्ञबालके साधक आम्ही ।
तुझ्या रंगणी रंग चढो ।।
मातपित्याच्या अंकावरती ।
रंगसाधना सुफलित हो ।।३।।

●●●

# जातकयज्ञ

## दोन अंकी पौराणिक संगीत नाटक

## *।। अंक १ ला ।।*

## *।। प्रवेश १ ला ।।*

अगस्त्य ऋषी आप्री सुक्त गात आहेत. स्वःकार सुरू आहे. (ऋग्वेद स्. १८८ मं १)

[अगस्ति मैत्रावरुणिः । आप्रीसूक्तं [१. इघ्मः समिद्धोऽग्निर्वा, २. तनूनपात् ३. इळ ४. बर्हि ५. देवीर्द्वार ६. उषासनक्ता ७. दैव्यौ होतातै प्रचेतसौ, ८. । तिस्त्रो देव्यः : सरस्वतीलाभारत्य ९. त्वष्टा, १०. वनस्पति ११. स्वाहाकृतयः] गायत्री ।

समिध्दो अद्य राजसि देवो देवैः सहस्त्रजित् । दूतो हव्या कविर्वह १.

तनू न पादृतं यते मध्वां  यज्ञः समज्यते । दधत् सहस्त्रिणीरिषः २.

आजुह्वानो न ईड्यो देवाँ आ वक्षि यज्ञियान् । अग्नै सहस्त्रसा असि ३

प्राचीनं बर्हिरोजसा सहस्त्र वीरमस्तृणन् । यत्रादित्या विराजथ ४.

विराट् सम्राड्विभ्वीः प्रभ्वी र्बह्वीश्च भूय सी श्च याः । दुरो घृतान्यक्षरन् ५.

सुरुक्मे हि सुपेशसा ऽ धिंश्रिया विराजतः । उषासावेह सी दताम् ६.

प्रथमा हि सुवाचसा होतारा दैव्या कवी । यज्ञं नो यक्षतामिमम् ७.

भारतीळे सरस्वति या वः सर्वा उपबुवे । ता नश्चोदयत श्रिये ८.

त्वष्टा रुपाणि हि प्र भुः पशून् विश्वान् त्समान्जे । तेषां नः स्फातिमा यज ९.

उपत्मन्यां वनस्पते पाथो देवेभ्यः सृज । अग्निर्हव्यानि सिष्वदत् १०.

पुरोगा अग्निदैवानौ गायत्रेण समज्यते । स्वाहाकृतीषु रोचते ११.

(संपूर्ण सूक्त म्हटले पाहिजे असे नाही)

(निबिड अरण्यात अगस्ती ऋषींचा आश्रम आहे. अगस्ती ऋषींचा महाजातकयज्ञ सुरू आहे (पडद्या आड) उंच उंच वृक्षांच्या दाट अरण्याची पार्श्वभूमी. (पडद्याने किंवा कल्पकतेने उभी करावी किंवा गर्द हिरवा पडदा असावा) महाभयानक वादळ सुरू होते. महाप्रलय, आभाळ कोसळणे, या स्वरूपाचे. तरी त्यातूनही ऋषींचे यज्ञ मंत्र ऐकू येत आहेत. (हे सर्व साऊंड आणि लाईट इफेक्टने साधावे.)

(मंचावर अंधार उघडझाप करून चमकणाऱ्या लाईटस्मुळे प्रलयाचा भास व्हावा. मंत्रोच्चार विरून जातो.

उजव्या व डाव्या बाजूने, ऋषींच्या वेषातील दोन शिवगण, त्या वादळात सापडल्याप्रमाणे भेलकांडत, भेदरल्या अवस्थेत एकमेकांना येऊन धडकतात आणि अधिकच घाबरतात, भेदरल्या आवाजातच दोघे दोन दिशांना थरकाप उडालेल्या अवस्थेत म्हणू लागतात) त्राही ऽ त्राही ऽ त्राही.



**कैलास राणा शिवचंद्रमौळी**
**फणिंद्र माथा मुगुटी झळाळी**
**कारुण्य सिंधो भव दुःख हारी**
**तुजवीण शंभो मज कोण तारी...**

त्राहीऽ त्राहीऽ त्राहीऽ म्हणतच (एकमेकाकडे वळतात. पाहातात. दोघांना धीर येतो. ते एकमेकांना विचारू लागतात)..

**अवकाश** : भो, काल तू कसा फेकला गेलास?
**काल** : मी मी... तू कसा?...
**अवकाश** : बहुधा प्रलय होतोय ऽ
**काल** : कैलास डळमळतोय ऽऽ...
**अवकाश** : काहीच कळले नाही; येथे कसे आलो ते?
**काल** : बाकीचे शिवगण...?
**अवकाश** : आपली ही स्थिती; तर सामान्य लोकांची कशी?

(तेवढ्यात पुन्हा वादळाचा जोर वाढतो. ते दोघे खूपच घाबरले आहेत.)

**अवकाश** : त्राही त्राही हे शंभो, कैलासनाथा, त्राही त्राही... त्राही त्राही...
**आणि काल** त्राही त्राही. (तेव्हढ्यात वादळाचा आवाज कमी होतो आणि मंचावर नारायण मंत्राचा चिपळ्यांसह आवाज घुमतो.)
**नारद** : नारायण नारायण, नारायण नारायण
अखेर मार्ग सापडला... पण पण
हे काल, अवकाश, तुम्ही दोघे येथे काय करीत आहात?
**काल,** : प्रणाम नारदमुने, आम्ही इथे कसे आलो कळलेच नाही.
**अवकाश** महाभयाण वादळ! असे पूर्वी कधीच पाहिले नाही!
**अवकाश** : हो ना, कैलासावरल्या आमच्या वास्तव्यात हे पहिल्यांदाच.
**काल** : हे मुने कैलासही दोलायमान व्हावे; असे विपरित काय घडले? आम्ही भयभीत झालो आहोत. आम्हाला, कैलासावर परत कसे जावे; ते ही कळत नाही.
**अवकाश** : की असाच झंझावात आम्हाला थेट कैलासातच पोचवणार?
**काल** : हे नारदमुने, आपण त्रिकालज्ञ आहात, आपणच आता आम्हाला अभय द्यावे.
**अवकाश** : हे काय घडले आहे? कसे? आम्ही अगदी भयभीत झालो

आहोत. येथे अज्ञात स्थळी, आता आपल्या शिवाय आम्हाला कोणता आधार आहे?

**नारद** : नारायण नारायण, काल, अवकाश, असे घाबरू नका. या भयाण झंझावातासह, प्रत्यक्ष शिवांनीच तुमची प्रेरणा येथे, या महर्षी अगस्त्यांच्या आश्रमासाठी केली आहे.

**काल आणि अवकाश** : म्हणजे, आम्ही समजलो नाही मुनीवर, हा अगस्ती आश्रम आहे? प्रत्यक्ष प्रभूंनी आम्हाला पाठविले आहे?

**अवकाश** : पण का? कशासाठी? (दोघेही अधीर झाले आहेत)

**नारद** : नारायण नारायण, (नारदमुनी विणेची तार छेडत, चिपळ्यांचा खळखळाट करीत, सांगू लागतात) काल, अवकाश, ऋषी अगस्त्यांचा अधिकार मोठा आहे. त्रिदेवांनी सर्व देवांचे, दानवांपासून संरक्षण करण्यासाठी अगस्त्यांची निर्मिती, प्रत्यक्ष शिवस्वरूपात, एका विशिष्ट यज्ञसत्रात केली. देवेंद्रांनी, अप्सरा उर्वशीदेवींची योजना करून; मित्रावरुणांना कामोत्सुक केले, त्यांच्या वीर्यरूपाने, त्रिदेवांचे तेज प्रकटविले. यज्ञप्रसंगी ब्रह्मचर्य भ्रष्ट करणारी घटना घडल्याने; ते महातेजस्वी वीर्य, मित्रावरुण ऋषींनी अर्घ्यरूपाने, मानसकुंभात प्रदान केले. त्या तेजाने महातेजस्वी, त्रिकालज्ञ, सर्वशक्तिमान, महायोगी, सिद्ध, अगस्त्यऋषी मानससरोवरांच्या मध्यातून; तर मानसतीरावरून ऋषी वशिष्ठ निर्माण झाले.

**काल** : परंतु मुनीवर, महर्षी अगस्त्यांचा जन्म होऊन तर युगे लोटली आहेत. कालकेशींचा आणि दानवांचा वध करण्यासाठी समुद्रप्राशनाची लीलाही त्यांनी केली. म्हणून तर समुद्राचे पाणी खारट झाले ना? (काल हसत म्हणतो.)

**अवकाश** : मुनीवर, सूर्य चंद्राचा नित्य परिक्रमा क्रमही, विंध्यपर्वताला आज्ञा करून; ऋषी अगस्त्यांनी नियमित केला, यालाही काळ लोटला.

**काल** : समुद्रमंथनातून अमृत कुंभ आणण्यातही; ऋषी अगस्त्यांनी उपस्थित राहून महान कार्य केले. या अनेक प्रसंगी आमच्यावर असे कार्य सोपविले नाही. मग आत्ताच का?



(दोघांच्या प्रश्नांची सरबत्ती मोठ्या कौतुकाने नारद पाहात होते.)

**नारद** : नारायण नारायण... हो हो... काल, अवकाश असे अधीर होऊ नका. तुम्ही दोघे सृष्टीचलन आणि व्यवस्थापन कार्यातील महत्त्वाचे शिवगण आहात. आता, महर्षी अगस्त्यांवर सृष्टी व्यवस्थापनाचेच कार्य सोपविले आहे. त्यात तुमची सेवा महत्त्वाची ठरणार आहे.

**काल** : म्हणजे? मी नाही समजलो.

**अवकाश** : दानवांनी काही आगळिक केली का?

**नारद** : नारायण नारायण, शिवगणहो, असे काही घडले नाही.

**काल** : मग?

**नारद** : हो हो. त्याचेही एक रहस्य आहे! नारायण. नारायण.

**अवकाश** : रहस्य? हे मुनिवर, ते रहस्य कोणते?

**नारद** : नारायण नारायण. ब्रह्ममानसपुत्रांप्रमाणे, महर्षी अगस्त्यांनाही गृहस्थाश्रम स्वीकारण्याची आज्ञा झाली आहे.

**काल** : परंतु मुनिवर ऋषी अगस्त्य तर अखंड ब्रह्मचर्य व्रती आहेत ना?

**नारद** : नारायण, नारायण. हो, हो, तोच तर घोटाळा झाला आहे.

**अवकाश** : घोटाळा? म्हणजे? ऋषी अगस्त्यांचे ब्रह्मचर्य स्खलित तर झाले नाहीना?

**काल** : कोणा अप्सरेला प्रेरित करून या उर्वशेयांना संमोहित तर केले नाही ना?

**नारद** : नाही असे काहीच झाले नाही. मित्रावरुणींची संताने आणि शरण येऊन, अगस्त्यानुगामिनी झालेले दानव, अर्थात त्यांचे पुत्रच!....

**अवकाश** : त्या पुत्रांचे काय?

**नारद** : तोच तर घोटाळा झाला आहे. स्वतःला अगस्त्यपुत्र समजणाऱ्या, या सन्तानांना, सत्यगती कशी प्राप्त होणार? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

**काल** : म्हणजे? आम्ही नाही समजलो.

**नारद** : नारायण, नारायण, त्याचेही एक रहस्य आहे.

**अवकाश** : म्हणजे महर्षी अगस्त्यच एक रहस्य दिसते!

**काल** : त्यांची निर्मिती तर देवेंद्रांच्या विनंतीनुसार, त्रिदेवांच्या तेजातून झाल्याचे, आपण म्हणालात ना!

**नारद** : होय, त्यांची निर्मिती देव, दानव आणि सृष्टी यांच्या व्यवस्थापनासाठी झाली खरी, परंतु...

**अवकाश** : म्हणजे?

**नारद** : त्यातूनच हा नवा प्रश्न निर्माण झाला.

**काल** : कोणता?

**नारद** : त्याचा इतिहास मोठा गमतीशीर आहे. सृष्टीनिर्मिती करून ब्रह्मदेवांनी उद्‌भिज, स्वेदज, अंडज आणि जारज, जीवसृष्टी निर्माण केली. त्यात देव, दानव आणि मानव, अशी मानस जीवसृष्टी निर्माण केली खरी. परंतु त्यातून या सृष्टीच्या प्रजनन चक्रनेमीक्रमाचा प्रश्न निर्माण झाला.

**काल** : हे सर्व अनाकलनीय आहे; तरी आम्ही याचे साक्षी आहोत!

**अवकाश** : ब्रह्मदेवांनी हा प्रश्न कसा सोडवला?

**नारद** : प्रत्यक्ष शिवांपासून, ऋषीकार्य करणाऱ्या सर्व मानसपुत्रांवर प्रजापती होण्याचे कार्य सोपविले. त्या प्रजापतींमुळे मानवी अस्तित्वांचे प्रजननचक्र नियमित झाले खरे; परंतु... नारायण नारायण (दोघेही उत्सुकतेने नारदांकडे पाहात आहेत.) प्रत्यक्ष प्रजापतीचे कार्य करणाऱ्या, मानवस्वरूप आदर्श अस्तित्वांच्या, मरणोत्तर अस्तित्वाचा, प्रश्नच पुढे आला.

**काल** : म्हणजे?

**नारद** : म्हणजे 'पुनरपिजननम् पुनरपिमरणम्' हे सूत्र चारी खाणींना लावले. परंतु...

**अवकाश** : परंतु काय मुनिवर?

**नारद** : मानवी अस्तित्वांना त्यांच्या सृष्टीचक्रातील कार्यामुळे, तात्काळ पुनर्‌जनन संभव, अशक्य होऊन बसला.

**काल** : का?

**नारद** : एकाच जन्मात, प्राप्त अवकाशात, सर्व कार्य घडणे शक्य नसे. मानवाच्या प्रतिभेचा विलास थेट त्रिदेवांप्रमाणेच आहे. ते कार्य तर पूर्ण होणे आवश्यक आहे. ते पूर्ण झाल्याखेरीज, त्याची प्राप्त योनीतून सुटका होणे अशक्य होऊन बसले.

**अवकाश** : हे मुनिवर, हे तर आमच्यासाठी सर्व गूढ आहे. कैलासी वास करणाऱ्या आम्हा शिवगणांना हे काहीच ज्ञात नाही. यावर उपाय कोणता?

**नारद** : यासाठी पुत्रपौत्रांनी उत्तरक्रिया करावी असा उपाय शोधला. ऋषी अगस्त्यांची संताने, खरे तर हे सारे पूर्वज, अधांतरीच राहिले. त्यांनी त्रिदेवांकडे आपले गाऱ्हाणे मांडले. त्रिदेवांनी महर्षी अगस्त्यांना गृहस्थाश्रम स्वीकारण्याची आज्ञा केली.

**काळ** : बस, एवढेच? हे तर खूपच सोपे आहे. या पृथ्वीवर वधुसंशोधन करून विवाह करण्याची प्रथा तर; आता सर्व प्रजापतींनी स्वीकारली आहे.

**नारद** : हो हो, हे खरे, तथापि महर्षी अगस्त्य, प्रत्यक्ष शिवस्वरूप असल्याने, हे सहज शक्य नव्हते. महर्षी अगस्त्यांना कोणीही वधू पसंत पडेना. त्यांना त्यांच्याएवढीच, महान आणि तेजस्वी, सृष्टी व्यवस्थापनाचे कार्य करणारी, वधू हवी होती. त्रिदेव आणि अगस्त्यांचे सर्व पुत्र पुन्हा चिंतेत पडले.

**अवकाश** : मग, अगस्त्यांनी गृहस्थाश्रम स्वीकारायचा नाही; असे ठरविले की काय?

**नारद** : नारायण नारायण, तसे ठरविणे महर्षींच्या हातात नव्हते. ते तर ब्रह्माविष्णूमहेशांचे आज्ञांकित होते.

**काल** : मग मार्ग निघाला का काही?

**नारद** : तेच तर रहस्य आहे. नारायण नारायण, अस्मादिकांनी महर्षींना, ते, त्रिदेव शक्तिमान, शिवस्वरूप आणि ब्रह्ममानसपुत्र असल्याचे स्मरण करून दिले. मी त्यांना हवी तशी वधू निर्माण करण्यासाठी ब्रह्मदेवांकडून अनुमती घेण्यास सांगितले. महामाया, महालक्ष्मी, महाकालींनी त्यांना सहाय्य होतील या दिलेल्या वचनाचे स्मरण करून दिले.

**काल** : महर्षे काय सांगता; वधू निर्माण करण्यासाठी अनुमती? हे तर जगाच्या विपरित म्हणायचं!

अवकाश : मुनिवर, आपण त्यांना स्वतःसाठी वधू निर्माण करण्याचा परामर्श दिलात? स्वतःसाठी स्वतः वधू निर्माण करायची? हे तर त्रिदेवांनाही अशक्य! मुनिवर, असा परामर्श, आपण कां बरे दिलात?

नारद : शिवगणहो, परब्रह्म्याची इच्छा, दुसरे काय? नारायण, नारायण!

काल : ब्रह्मदेवांनी अनुमती दिली?

नारद : ब्रह्मदेवांपुढे दुसरा पर्यायच नव्हता.

अवकाश : भगवान विष्णू, भगवान शिव, आदिशक्ती कोणीच या सृष्टीविपरित कार्यासाठी, अनुमती देण्यापासून ब्रह्मदेवांना परावृत्त केले नाही?

नारद : नारायण, नारायण, कसे परावृत्त करणार? सर्वच अडकले. म्हणूनच तर, महर्षी अगस्त्यांनी जातकयज्ञ मांडला आहे! (महर्षी अगस्त्य तेव्हढ्यात प्रवेशतात)

महर्षी अगस्त्य : प्रणाम मुनिवर!

नारद : आपण स्वतः! प्रणाम!

महर्षी अगस्त्य : प्रियजनांच्या स्वागतासाठी स्वतः पुढे व्हावे, नव्हे काय?

नारद : नारायण, नारायण, महर्षी अगस्त्य प्रत्यक्ष महेश्वरांनी आपल्या या जातकयज्ञ संपन्नतेत सहाय्य करण्यासाठी, काल आणि अवकाश या शिवगणांना पाठविले आहे. (काल आणि अवकाश महर्षी अगस्त्यांना प्रणाम करतात. अगस्त्य त्यांना आशीर्वाद देतात.)

महर्षी अगस्त्य : भगवान शिवांची मोठीच कृपा म्हणायची.

नारद : महर्षी, आपला अधिकार मोठा. महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती, आणि सृष्टीतील सर्व मातृकांना महर्षींनी आवाहन केले आहे. सर्व मातृकांचे सद्गुण, अर्थात जीवमात्रांचे सर्व सुअवयव, सर्वशक्तीकण, एकवटून एकमेवाद्वितीय शक्ती, निर्माण करण्याचा संकल्प महर्षींनी केला. सगळ्या मातृकांनी या संकल्पाला सहाय्य करण्याचे वरदान दिले.



महर्षी अगस्त्य : मुनिवर, त्रिदेवांच्या लीलेला सर्वप्रकारे सहाय्य करण्याचे आपले कौशल्य आम्ही जाणतो.

नारद : नव्हे नव्हे महर्षी, आपला जातकयज्ञ ब्रह्मांडात अभूतपूर्व आहे. आपण अग्नींवरच समस्त मातृकांस्वरूप लोपामुद्रादेवींना वधू म्हणून प्रकटविण्याचे कार्य सोपविलेत. आपण खरोखरच धन्य आहात.

**ब्रह्मविष्णूशिवस्वरूप, धन्य ऋषी अगस्त्य ।**
**हे जातक यज्ञ कर्म अकल्प्य नि अतर्क्य ।।ध्रु।।**

**त्यागुनी वधू संशोधन**
**सज्ज स्ववधु निर्मितीस**
**शक्तीगुणसंपन्न वधू,**
**संकल्प अद्वितीय ।।१।।**

**उद्धरण्या तव गोत्रज**
**स्वीकारिसी गृहधर्म**
**वधू लोपा त्वा नेमुन**
**प्रजनन रिती साध्य ।।२।।**

**व्यवस्थापन विश्वाचे**
**कार्य त्रिदेवशक्तींचे**
**नियत कार्य जन्माचे**
**पुरुषार्थ करिसी सिद्ध ।।३।।**

(गाणे संपताच शिवगण अगस्ती महाराज की जय अशी आरोळी ठोकतात.)

महर्षी अगस्त्य : मुनिवर, आमची प्रशंसा आता पुरे, आपण सर्व योग्यवेळी यज्ञसमीप आला आहात. आपण स्वतः शिवगणहो आपणही आम्हा ऋषींसमवेत पूर्णाहुती प्रदान करावीत आणि न वजात लोपामुद्रांचे स्वागत करावे.

महर्षींसह तिघेही रंगमंचावरून जातात. प्रवेश पहिला समाप्त होतो. रंगमंचावर अंधार होत असतानाच प्रदीर्घ शंखध्वनी होतो. (अगस्त्यांच्या हातात नवजात बालक आहे. तिघे पुष्पवृष्टी करतात.)

**अंक १ ला प्रवेश १ ला समाप्त** ●●●

# ।। अंक १ ला - प्रवेश २ रा ।।

(मंचावर मंद प्रकाशात महाराज्ञी श्री दिव्यांची कसलीशी तंद्री लागली आहे. चेहऱ्यावरची खंत आणि उदासीनता झाकत नाही, शून्यात नजर लावून मंचावर बसलेल्या, राज्ञींना, विदर्भराज निमी, राणीवशात आल्याचेही लक्षात येत नाही.)

**विदर्भराज निमी** : (महाराणींकडे पाहात शंकित होतो, महाराणींना हाक मारून देखील त्यांचे लक्ष नाही असे पाहून चिंतीत होत स्वगत) महाराणी, श्री दिव्या, कुठला बरं विचार करीत असाव्यात? त्यांचे स्वास्थ्य तर ठीक आहे ना? पण स्वास्थ्य तर ठीक वाटते! कसलेसे संकट समोर दिसते का? पण त्या तसे काही बोलल्या नाहीत. त्या कोणत्याही संकटांना घाबरणाऱ्या नाहीत. मग आमची भेट लवकर न झाल्याने त्या उदास झाल्यात का? पण तसे नसावे. मग या देवेंद्रांनाही लाजवील, अशा वैभवसंपन्न राऊळात, विदर्भराज्ञी अशा उदास का? ग्रहणाचे वेध लागलेल्या चंद्रासारखे, त्यांचे म्लान मुखकमल पाहावत नाही. नेहमी हसतमुखाने अवघ्या विश्वाला प्रसन्नता प्रदान करणाऱ्या राज्ञी, अशा उदास का? त्यांना सावध करूनच विचारावे. (जवळ जाऊन) हे श्री दिव्या (हाक मारूनही लक्ष जात नाही म्हणून स्पर्शाने सावध करण्याचा प्रयत्न करतो. महाराजांचा स्पर्श होताच त्या दचकतात.)

**महाराज्ञी श्री दिव्या** : अगंबाई, महाराज, आपलं केंव्हा येणं झालं? (गडबडून उभी राहाते)

**विदर्भराज** : आपली तंद्री लागली होती! कसली चिंता करता?

**महाराज्ञी श्री दिव्या** : कसली नाही. उगाच आपली. आपण बसा ना. मला कसं ते आपण आल्याचंही भान नाही.

**विदर्भराज** : प्रिये मला नाही का सांगणार?

**महाराज्ञी श्री दिव्या** : नाथ कसं सांगू? मला हे सारं राजवैभव नको, पट्टराज्ञीपण नको मला... मला... कसं सांगू?



**विदर्भराज** : हे बघ प्रिये, तुला जे वाटतं, ते सांग, मनात साठवून कसं बरं चालेल?

**महाराज्ञी श्री दिव्या** : हे आर्य, मला सारखं वाटतंय मी अपूर्ण आहे.

**विदर्भराज** : महाराणी, त्रैलोक्यातील सर्व ऐहिक सुख, आपल्या पायाशी अक्षरशः लोळण घेत आहेत. अगदी माझ्यासह. असं असताना, असं का बरं म्हणता?

**महाराज्ञी श्री दिव्या** : नाथ या वैभवातही मला अपूर्णता जाणवते आहे! कसं सांगू?

**विदर्भराज** : सांगा, महाराणी सांगा, आपल्याला कशाची कमी जाणवते आहे?

**महाराज्ञी श्री दिव्या** : हे आर्य मला... मला या साऱ्या वैभवात, सृष्टीसतीच्या लडिवाळाची अपूर्णता जाणवते आहे...

**विदर्भराज** : म्हणजे, मी नाही समजलो, प्रिये सांग बरं... सांऽग, ना.

**महाराज्ञी श्री दिव्या** : महाराज, मला कन्या नाही, कन्या हवी आहे. कन्येशिवाय अवघे विश्व निरर्थक आहे. हे नाथ या सृष्टीचं महासतीत्व अनुभवण्यासाठी, माझ्या जीवनाचं सार्थक करण्यासाठी मला माझी कन्या हवी... सांगू?...

**खंत मनी सतत अशी सांगू कशी, नाथा,**
**सगुणखाणी हवी अशी कन्या सुलक्षणा ।।धृ।।**
**गुंजावा नाद भरूनी राऊळात अंगणात**
**दुडुदुडु धावत येऊनी बिलगावे ममम कवेत**
**बालहट्ट पुरवावे लटक्या रागा सहित**
**तिच्यासवे तिच्यापरी खेळूया उभयता ।।१।।**
**ज्ञान कला चातुर्यही हो व्हावे पारंगत**
**संस्कारित बहरावे यौवन या राऊळात**
**स्वरूप केतकी सुगंध पसरावा दशदिशात**
**चंद्रकला दिव्य अशी मांडिता स्वयंवरा ।।२।।**
**त्रैलोक्यी ही कन्या व्हावी ख्यातकीर्त**

**प्रकटावी आदिशक्ती तिच्या रूपे जगतात**
**वर लाभो तिला असा विश्वीया अजिंक्य**
**जीवनाची परिपूर्ती करू साधूनी पुरुषार्था ।।३।।**
महाराज होईल न हो माझी इच्छा पूर्ण?...

**विदर्भराज** : हे प्रिये, तुझी इच्छा नक्कीच पूर्ण होईल. आपण त्यासाठी अनुष्ठान मांडू. सती पार्वती अंबिका, तुमची इच्छा नक्कीच पूर्ण करतील. मात्र आपण असं उदास नाही व्हायचं.

**अंक १ ला प्रवेश २ रा समाप्त**

•••

## ।। अंक १ ला - प्रवेश ३ रा ।।

(महामंत्री सूर्यप्रकाश, राजपुरोहित कौंडिण्य उपस्थित आहेत. विदर्भराज आणि विशेष प्रसन्न असलेल्या श्री दिव्या प्रवेशतात. प्रवेशण्यापूर्वी सेवक बाहेरून आरोळी देतो. ''चक्रवर्ती, सम्राट, महाराजाधिराज निमी महाराज, महाराज्ञी श्री दिव्या देवींसह राजदरबारात प्रविष्ट होत आहेत हो सावधान!'' विदर्भराज निमी आणि महाराज्ञी श्री दिव्या प्रवेशतात. आसनस्थ होतात. महामंत्री सूर्यप्रकाश आणि राजपुरोहित कौंडिण्य महाराजांनी संकेत देताच आसनस्थ होतात. मात्र प्रधानमंत्री सूर्यप्रकाश पुन्हा उभे राहतात.)

**महामंत्री सूर्यप्रकाश** : महाराजांना त्रिवार वंदन, महाराज आज राजदरबाराचा, कोणताही संकेत नसतांना; आपण मला राजपुरोहित कौंडिण्यांसह आमंत्रित केलंत. काय आज्ञा आहे? कार्यसुलभतेसाठी कथन करावे.

**विदर्भराज** : प्रधानजी, राजपुरोहित कौंडिण्यांना पाचारण करण्याचे कारणही तसेच आहे.

**प्रधानमंत्री सूर्यप्रकाश** : कोणते महाराज?

**विदर्भराज** : प्रधानजी, आज पहाटे, शुक्रोदयानंतर, महाराणींनी एक सुस्वप्न अनुभवले. त्याचा अर्थ राजपुरोहित कौंडिण्यांकडून जाणून घ्यावा; असे महाराणींना वाटते.

**राजपुरोहित कौंडिण्य** : प्रणाम महाराज, या शुभप्रहरी, महाराज्ञींच्या सुस्वप्नाचा अर्थ लावण्याचे भाग्य आम्हाला मिळणार. अहो भाग्यम्! महाराज्ञी श्री दिव्या, आपण साक्षात श्रीलक्ष्मीस्वरूप आहात. आपल्या सुस्वप्नाने निश्चितच साम्राज्यात आनंदी आनंद होईल...

**महाराज्ञी श्री दिव्या** : हो हो (मोठ्या आनंदाने) राजपुरोहित, मला स्वप्न तर कथन करू द्या...

**राजपुरोहित कौंडिण्य** : महाराज्ञी, आम्ही ऐकण्यास उत्सुक आहोत. (महाराज्ञी अवकाशात एकटक पाहात स्वप्न कथन करतांना स्वतःला हरवतात)

**महाराज्ञी श्री दिव्या** : राजपुरोहित, राऊळाच्या नंदनवनात, कस्तुरीचा सुगंध दाटला होता. अवघे नंदनवन गंधमुग्धतेने, शुक्राच्या संमोहक चांदण्यात, उजळून निघाले होते. वृक्षलता आणि पुष्पवाटीकांतील सप्तरंगी फुले फुलतांना शुक्रमादक स्वगंध, त्या कस्तुरी गंधात मिसळून; फुले उमलत होती. विस्मयकारिकतेने, प्राची प्रदेशातून, एक दिव्य शलाका नंदनवनात प्रकट झाली. ती शलाका नंदनवनात क्रीडा करू लागली. इंद्रदरबारातील अप्सरा, जलस्थल आकाशमातृका, एवढेच काय, शारदा, महालक्षी आणि प्रत्यक्ष सतींपेक्षाही, ती शलाका संमोहक आणि तेजस्वीपणाने परंतु अल्लडपणाने, अवघे नंदनवन, आपल्या क्रीडेने, उल्हसित करीत होती. ती दिव्यशलाका आपल्या स्पर्शाने अवघ्या नंदनवनाला स्वर्णमयी, तेजस्वी करीत होती. पाहता पाहता ती लडिवाळ, क्रीडामग्न, दिव्यशलाका, थेट आमच्या समिप आली. त्या शलाकेला बाहुपाशात घेऊन; हृदयाशी कवटाळावे; अशी तीव्र भावना, आम्हाला होत होती. काय होते आहे कळण्यापूर्वीच; ती दिव्य शलाका, आमच्या हृदयात क्रीडा करीत; गात्रगात्र पुलकित करू लागली. क्षणभर मीच शलाका झाले असे वाटले आणि त्या संमोहित अवस्थेतच मला जाग आली. मन आनंदाने भरून गेले. गात्र सुखाने भारावून गेले. पण त्या स्वप्नाचा अर्थ मात्र कळेना!... (भानावर येऊन)

राजपुरोहित, काय असेल या स्वप्नांचा अर्थ? सांगा सांगा... मी अधीर झाले आहे...

**राजपुरोहित कौंडिण्य** : धन्य धन्य महाराज्ञी, आपण धन्य आहात. असे शुभस्वप्न, केवळ महाराज्ञींनाच अनुभूत होऊ शकते. महान राजयोग दिसतो. महाराज्ञी आपली कीर्ती दशदिशात पसरेल; असे कार्य आपणाकडून घडण्याचा हा संकेत आहे. (तेव्हढ्यात नारायण, नारायण मंत्रघोष करीत नारद प्रविष्ठ होतात. त्यांना पाहताच निमीमहाराज, राज्ञी श्री दिव्या गडबडीने उभे राहतात. महामंत्री आणि पुरोहित अदबीने उभे राहतात.)

**विदर्भराज** : हे ब्रह्ममहर्षे, आपणास आम्हा उभयतांचे वंदन असो. आपण आसन ग्रहण करावे. परंतु... सारे कुशल आहे ना? (महाराज काहीशा अधिरतेने विचारतात.)

**नारद** : कल्याणमस्तु! नारायण, नारायण, महाराज्ञी श्री दिव्यांना स्वप्न संकेत झालाच आहे. तेच शुभवर्तमान सांगण्यासाठी, मी ब्रह्माविष्णूमहेशांच्या आज्ञेने, उपस्थित आहे. नारायण, नारायण.

**विदर्भराज आणि महाराज्ञी श्री दिव्या** : (एकाचवेळी) कोणते शुभवर्तमान मुनिवर, प्रत्यक्ष त्रिदेवांनी आमच्यासाठी दिले?

**नारद** : महाराज आपण सर्वांनी स्थानापन्न व्हावे. शुभवर्तमान ऐकण्यासाठी एकाग्रपणे सिद्ध व्हावे (सर्व स्थानापन्न होतात. अतिथीस्थान रिकामे आहे. ते नारदांचे. नारद कीर्तनाच्या शैलीत मुद्रा घेऊन वर्तमान सांगू लागतात...) राजन, महाराज्ञी, आपण उभयतांनी कन्येसाठी जातकयज्ञ करण्याची वेळा समीप आली आहे. प्रत्यक्ष महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वतीसह समस्त मातृकांचे तेज, श्री दिव्यांच्या कुशीत प्रकटणार आहे!

**महाराज्ञी श्री दिव्या** : म्हणजे... म्हणजे मुनिवर मला कन्यारत्न होणार, असाच ना; या सुस्वप्नाचा अर्थ? महाराज, मुनिवर, मी धन्य झाले.

**नारद** : नारायण, नारायण, महाराज्ञी आपण धन्य आहात. परंतु...

**विदर्भराज** : मुनिवर, आता यात परंतु का बरे?



**नारद** : महाराज, महाराज्ञींना आणि आपल्याला जातकयज्ञाचा संकल्प करावा लागेल.

**विदर्भराज** : मुनिवर आपण सांगाल ते आम्ही करू.

**नारद** : होय, तशी त्रिदेवींची आज्ञाच आहे. यामुळेच आपले जीवन सुफलित होणार आहे.

**महाराज्ञी श्री दिव्या** : आज्ञा मुनिवर, मी कोणतेही दिव्य करायला तयार आहे. आपण सविस्तर उकलून कथन करावे.

**प्रधानजी सूर्यप्रकाश** : आम्ही सर्वच ऐकण्यासाठी उत्सुक आहोत.

**नारद** : नारायण, नारायण, महाराज, ब्रह्माविष्णूशिव तेजातून प्रकटलेले मान, मान्य, मांदार्य, शिवस्वरूप, कुंभोद्भव, महर्षी अगस्त्य, आपणाकडे यावयास निघाले आहेत.

**विदर्भराज** : काय ब्रह्ममानसपुत्र, सृष्टीनियंते, महर्षींचे आगमन होत आहे? केव्हढे भाग्य! विदर्भ पावन होणार! मुनिवर काय हवे आहे महर्षींना?

**नारद** : राजन्, राज्ञी; महर्षींनी त्रैलोक्यात अद्वितीय असा जातकयज्ञ सफल केला आहे. त्या जातकयज्ञातून अग्निदिव्या, महाशक्ती, लोपामुद्रा प्रकट झाल्या आहेत.

**महाराज्ञी श्री दिव्या** : म्हणजे?

**नारद** : महाराज्ञी, त्याच अग्निदिव्या लोपामुद्रांना, आपल्या ओटीत घालण्यासाठी महर्षी येत आहेत. यज्ञातून प्रकटलेल्या नवजात कुमारीच्या स्वरूपातील या लोपामुद्रांना महर्षी अगस्त्यांनी, सर्व दिव्यशक्तींच्या सद्गुणांचे आणि सुअवयवांचे एकत्रीकरण करून; जातकयज्ञातून कन्या स्वरूपात, स्वतःसाठी वधू म्हणून निर्माण केले आहे. म्हणूनच तर, ती सर्वशक्तिस्वरूपिणी, अग्निदिव्या, लोपामुद्रा आहे. ही अलौकिक शक्ती आपली कन्या म्हणून येथे प्रकट होणार आहे.

**महाराज्ञी श्री दिव्या** : म्हणजे, माझ्या स्वप्नसंकेताचा अर्थ...

**नारद** : होय, महाराज्ञी, तीच आपली कन्या म्हणून प्रकटावी; असे ब्रह्मलिखित आहे. म्हणूनच तिच्या स्वीकाराबरोबरच तुमचे मातृत्व प्रकट होऊन; जातकयज्ञ सुरू होईल.

**विदर्भराज** : हे मुनिवर, हीच जर विधात्याची इच्छा असेल तर; आम्ही उभयतां, तिचे मातापिता म्हणून तिचा स्वीकार करायला, उत्सुक आहोत. होय ना महाराज्ञी? (हे ऐकतांनाच राज्ञींना भोवळ आली आहे) काय काय होतं आहे महाराज्ञी...

**नारद** : नारायण, नारायण, त्यांना मातृवृत्तीच्या चाहुलीने भोवळ आली आहे. चिंता नको. नारायण, नारायण... उठा उठा महाराज्ञी...

**महाराज्ञी श्री दिव्या** : (सावध होत) मुनिवर... कुठे आहे माझी कन्या? अग्निदिव्या... कुठे आहे?

**नारद** : राज्ञी, अधीर होऊ नका, काही क्षणातच महर्षी अगस्त्य येथे, यज्ञ प्रसादस्वरूप, लोपामुद्रांना घेऊन येतील. त्यांचे स्वागत करा. येतो आम्ही... (नारायण मंत्र जप करीत सर्वांचे वंदन स्वीकारून नारद निघून जातात) (सर्वजण सावरून बसतात).

**राजपुरोहित** : महाराज, आज खरोखरीच आम्ही जातक ऐकून धन्य झालो. हे त्रैलोक्यातील अतर्क्य, अकल्पनीय, एकमेवाद्वितीय जातक, येथे प्रकट होणार! साक्षात सर्वशक्तीस्वरूपिणी येथे प्रकटणार, ''सर्व मांगल मागल्ये । शिवे सर्वार्थ साधिके । शरण्ये त्र्यंबके, गौरी, नारायणी नमोस्तुते'' (असा मंत्रोच्चार करतात) (तोच शंख ध्वनि कानी येतो. आणि पाठोपाठ शिवगण काल प्रवेशतो).

**काल** : प्रणाम महाराज, महाराज्ञी, सृष्टीनियंते, ब्रह्ममानसपुत्र, शिवस्वरूप, महर्षी अगस्त्यांचे आगमन झाले आहे.

**विदर्भराज** : होय? आम्ही सारे त्यांच्या स्वागतासाठी प्रवेशद्वारी येतो. राजपुरोहित आपण स्वागत पूजनाची यथासांग तयारी करावी.

**महाराज्ञी श्री दिव्या** : महाराज, चला, चला आपण निघूया. (लगबगीने प्रधानजी राजपुरोहित, शिवगण काल जातात. पाठोपाठ महाराज आणि राज्ञीही जातात. रंगमंच काही क्षण रिकामा आहे. पडद्याआडून ''ॐ श्री भगवान महर्षी अगस्ति महाराज की जय'' असा जयकार ऐकू येतो. पुन्हा शंखध्वनी ऐकू येतो. आणि महाराज,



राज्ञी, मोठ्या सन्मानाने महर्षी अगस्त्यांना मंचावर घेऊन येतात. त्यांना सिंहासनावर विराजमान होण्यास विनंती करतात. शिवगणांच्या डोक्यावर पाटीमध्ये अर्भकस्वरूप लोपा निद्रावश आहेत)

**महर्षी अगस्त्य** : हे, चक्रवर्ती सम्राट विदर्भराज, आम्हास सिंहासन निषिद्ध आहे, आपणच ते ग्रहण करावे. अतिथी, सम्राटापेक्षाही, अधिकाराने श्रेष्ठ असतो, हे विसरलात? (सगळेच भयभीत होतात)

**विदर्भराज** : क्षमा असावी महाराज. आम्ही उभयता आणि हे साम्राज्य आपले दास आहोत. आपल्या दर्शनाने आम्ही धन्य झालो.

**सुंदर ते ध्यान । ऋषी योग मग्न**
**साधिता साधन । जगासाठी ।।१।।**
**कमंडलु कुदळी । घेऊनिया हाती ।**
**ज्ञान सिद्ध करी । अगस्त्य हा ।।२।।**
**जटाजुट माळा । रुद्राक्ष रुळती ।**
**गंधभस्म शोभे । शिवा जैसे ।।३।।**
**विश्वाच्या कल्याणा । योगी सिद्ध जाणा ।**
**ऋषी अगस्त्य साधना । अनिल म्हणे ।।४।।**

(गाणे संपल्यावर अगस्तीचरणी पुष्पे वाहतात.)

**महर्षी अगस्त्य** : हे विदर्भराज, आम्ही, आपणाकडे, सहाय्य करावे; अशी विनंती करण्यासाठी आलो आहोत...

**विदर्भराज** : आज्ञा असावी महाराज...

**महर्षी अगस्त्य** : आपण उभयतांनी या नवजात अर्भकाचा स्वीकार करून; त्याचे स्व अपत्यवत, संगोपन करावे, अशी आमची इच्छा आहे.

**महाराज्ञी श्री दिव्या** : ऋषीवर, केव्हढी ही कृपा आमच्यावर! आम्ही धन्य झालो! आम्ही मोठ्या आनंदाने आणि कर्तव्यबुद्धीने आपण व्यक्त केलेली; इच्छा पूर्ण करण्याचे वचन देतो.

**महर्षी अगस्त्य** : हे राजन, हे राज्ञी श्री दिव्या, आपणा उभयतांकडून आम्हास हीच अपेक्षा होती. परंतु...

**विदर्भराज** : महर्षी, आपण मनात कोणताही किंतू आणू नये. आपण तर

आमच्या हाती. आमचेच परमभाग्य सोपविले आहे.

**महाराज्ञी श्री दिव्या** : आपण निरोपिलेले मातृव्रत, हाच तर मुनिवर माझा धर्म आहे.

**महर्षी अगस्त्य** : राजन, राज्ञी, कोणत्याही कार्यात विवेकपूर्ण अवकाश हवाच.

**महाराज्ञी श्री दिव्या** : म्हणजे महर्षी...

**महर्षी अगस्त्य** : हे राजन, मी सांगत आहे ते आपण लक्षपूर्वक ऐकावे. मगच आपण हे कार्य स्वीकारावे.

**विदर्भराज** : महर्षी, आपण कोणतेही उत्तरदायित्व सोपविलेत तरी; धर्म, संस्कृती आणि सृष्टीसतीच्या कल्याणाचेच असणार, आम्ही ते व्रतस्थतेने करू.

**महर्षी अगस्त्य** : राजन, हे राजमाते, आम्ही आपल्या ओटीत हे अर्भक प्रदान करीत आहोत. ते विश्वाच्या काल आणि अवकाशात अद्वितीय आहे. आम्ही, समस्त शक्तीमत्तांचे सद्‌गुण एकत्र करून; जातकयज्ञातून हे सिद्ध केले आहे. हे अर्भक म्हणजे सर्वशक्तिमान सद्‌गुणसंपन्न, सर्वविद्याकला पारंगत, असे कन्यारत्न आहे. विशेष म्हणजे, अस्मादिकांना गृहस्थाश्रम सिद्ध करून, गोत्र स्थापन करायचे आहे. गोत्रजउद्धार करण्यासाठी, माझी वधू म्हणून; मी हे कन्यारत्न निर्मिले आहे. सृष्टीसतीच्या परामर्षानुसार आम्ही हे कन्यारत्न आपल्या ओटीत प्रदान करणार आहोत. ब्रह्मर्षी नारदमुनींनी, आपणास हे वृत्त सांगितल्याचे; आम्हास ज्ञात झाले आहे. तेव्हां...

**विदर्भराज** : हे भगवान महर्षी, अगस्त्या, आम्हाला, परमभाग्यवंत करून; आपण आमचा सृष्टीचलन महायज्ञात, उद्धार करीत आहात! आम्ही आमचे हे परम कर्तव्य; पुरुषार्थ आणि मातृपितृ भावाने आणि आपल्या आशीर्वादाने, पूर्ण करू. (दोघेही महर्षींना वंदन करतात)

**अगस्त्य महर्षी** : हे राजन, हे राज्ञी, आपण आपल्या आसनावर आरूढ व्हावे; म्हणजे हे कन्यारत्न आम्हाला आपल्या ओटीत घालता येईल.



(दोघे स्थानापन्न होतात) अवकाश घेऊन या कन्येला. (अवकाश आणि काल कन्यारत्न घेऊन पुढे होतात. एवढ्या वेळ केवळ गप्प असलेले महामंत्री सूर्यप्रकाश आणि राजपुरोहित कौंडिण्यही पुढे होऊन, महर्षींना वंदन करतात.)

**प्रधानजी सूर्यप्रकाश** : महर्षी, एक विनंती आहे. आपण हे सुकन्यारत्न राजमातांना प्रदान करतांना, जन्मोत्सवासमयीचा मंगलवाद्य निनाद व्हावा अशी इच्छा आहे.

**महर्षी अगस्त्य** : तथास्तु. (अवकाश, महर्षी जवळ येऊन डोक्यावरली पाटी हातात धरतो. कालही त्या पाटीचा तोल सावरतो. महर्षी कन्यारत्न हातात उचलून घेतात आणि महाराज्ञींच्या ओटीत प्रदान करू लागतात. प्रधानजी आणि राजपुरोहित टाळ्या वाजवतात तोच मंगलवाद्यांचा गजर सुरू होतो. महर्षी, राजन, राज्ञी आणि कन्या यांच्यावर अवकाशातून देवगण पुष्पवृष्टी करतात. मंगलवाद्यांचा गजर होत असतांनाच हळूहळू मंचावर अंधार होतो.)

**अंक १ ला प्रवेश ३ रा समाप्त**

•••

## ।। अंक १ ला - प्रवेश ४ था ।।

(मंचावर पाठीमागे केवळ उद्यानाचा पडदा आहे किंवा हिरवा पडदा आहे. मधुर असे वसंतोत्सवाचे संगीत सूर ऐकू येत आहेत, कोकीळ गात आहेत इ... स्वतःशीच गिरक्या घेत, नर्तन पदन्यास करीत, गाणे गातच अग्निदिव्या लोपामुद्रा प्रवेशते आहे. तिच्या पाठोपाठ तिची सखी वसंतलतिका लगबगीने प्रवेशते.)

**वसंतलतिका** : अगं अगं अग्निदिव्या, आज आहे काय?

**लोपामुद्रा** : (स्वतःशीच गिरक्या घेत)... वसंतलतिके अगं बघ ना, हे नंदनवन कसं नुसतं बहरलंय नाही! नुसतं नाचावसं वाटतं!

(हातात हात घेऊन) तुला नाही वाटत? तू अगदी अशीच आहेस बघ. (तिचे हात सोडून पुन्हा गाणे गुणगुणत धावत गिरकी मारते.)

**वसंतलतिका** : अग्निदिव्या, तू आज अगदी नावाप्रमाणे लोपामुद्रा झालीयेस... हरवलीयेस कुठे तरी. (लोपामुद्राचे हात हातात घेऊन) अगं सांगतरी. चित्त कुठंय तुझं?

**लोपामुद्रा** : काहीतरीच काय? म्हणे चित्त कुठंय? (लटक्या रागानं)

**वसंतलतिका** : नाहीतर काय; नाचत्येस काय; हुंदडतेस काय; स्वतःशीच हसत गाणं काय गुणगुणतेयस; काहीतरी घडलंय खास! सांग बघू मला. तशी सोडणारच नाही तुला (हातात हात धरून ठेवते)

**लोपामुद्रा** : सखे वसंतलतिके, कशी सांगू तुला? काय सांगू तुला...?

**वसंतलतिका** : सखी म्हणतेस, नि मनातलं गुज मात्र सांगत नाहीस. आज कळी खुललीये खरी...!

**लोपामुद्रा** : सखे, काही कळतनाहीसं झालंय. काहीतरी प्रिय होणार, कोणीतरी प्रिय येणार, असं सारखं वाटतंय, पण कळत नाही मग काय सांगू?

**वसंतलतिका** : नीट सांग बघू.

**लोपामुद्रा** : खूप नाचावसं वाटतंय गं, नुसतं हुरावून गेलंय. लतिके... कळतच नाहीगं...

**कशी सांगू सांगू कशी गुपीत मी कुणाला?**
**मनी मनी मनी, वनी वनी वनी वसंत बहरला ।।धृ।।**

ऐकलं का लतिके...

**मधुगुजन, कुहूकुजन नृत्य करी मयुर फुलून**
**वामअक्ष फडफडून बाहू स्फुरती गुणी शकून**
**अंतरात हुर हुर हुर रोमांचित अंग फुलून**
**राऊळावरूनी काक शकून जाहला ।।१।।**
**साद अशी सृष्टीतून तनू येई सळसळून**
**यवनध्वजा उंचावून वायू धुंदसा बिलगून**
**शब्द गंध नाद मधुर बघती, नयन भिरभिरून**



**उत्कंठित तनमन हे सज्ज आजला ।।२।।** कशी सांगू?

**वसंतलतिका** : अगं बाई कोणीतरी येणार गं येणार... प्रिये, तुझं, खास!

**लोपामुद्रा** : (आपल्याच नादात)

**कशी सांगू मी सांगू कशी गुपित कुणाला?**
**मनी मनी हा वनी वनी वसंत बहरला ।।**

गाणे संपतानाच रंगमंचावर हळूहळू काळोख पसरतो.

**अंक १ ला प्रवेश ४ था समाप्त**

•••

## ।। अंक १ ला - प्रवेश ५ वा ।।

(महर्षी अगस्त्य ध्यानस्त बसले आहेत. नारदमुनी प्रवेशतात.)

**नारद** : नारायण नारायण, प्रणाम महर्षी.

**महर्षी अगस्त्य** : प्रणाम मुनिवर, आपण?

**नारद** : पिताश्री भगवान ब्रह्मदेवांनी आपले स्मरण केले आहे.

**महर्षी अगस्त्य** : पिताश्रींनी आमचे स्मरण करावे; अहो भाग्य!

**नारद** : महर्षी आपले जातक कर्म कोठवर आले; हे पाहण्यासाठी पिताश्रींनी आम्हास पाठविले आहे.

**महर्षी अगस्त्य** : म्हणजे?

**नारद** : महर्षी आपल्या तमोमग्नतेआड येणाऱ्या सगळ्याच गोष्टी आपण सोयीस्कर विसरता!

**महर्षी अगस्त्य** : क्षमस्व, परंतु आम्हीच चिंतीत झालो होतो.

**नारद** : अहो, चिंतीत नव्हे; कार्यान्वित व्हायला हवे! लोपामुद्रादेवी उपवर झाल्या आहेत. वरसंशोधनाचा विचार विदर्भराज आणि

महाराणी दिव्यांनी सुर केला आहे.

**महर्षी अगस्त्य** : मुनिवर आम्हीतर आमची वधू संगोपनार्थ सोपवित आहोत हे स्पष्टपणे सांगितले होते. त्याचा विसर पडला की काय?

**नारद** : म्हणूनच महर्षी आपण कार्यान्वित व्हावे.

**महर्षी अगस्त्य** : म्हणजे?

**नारद** : महाराणी दिव्या, जगराहाटीप्रमाणे कन्येच्या विवाहास उत्सुक झाल्या आहेत. त्यांचे मन...!

**महर्षी अगस्त्य** : महाराज विदर्भराज निमींना वचनाचे स्मरण नाही?

**नारद** : महर्षी, आपणच जर असा कालापव्यय करू लागलात; तर असे घडणारच!

**महर्षी अगस्त्य** : परंतु मुनिवर आणखी एक किंतु मनात येतो...

**नारद** : कोणता?

**महर्षी अगस्त्य** : आम्ही अतिवृद्ध, तपोमग्न, ब्रह्मचारी, तेव्हा दुसरा काही उपाय...?

**नारद** : महर्षी आपण वचनबद्ध आहात. आपण जातकयज्ञपूर्वक लोपामुद्रादेवींना वधू म्हणून निर्माण केले आहे. तेव्हां, पण, परंत, किंतु यांना आता स्थान नाहीच!

**महर्षी अगस्त्य** : मुनिवर, लोपामुद्रादेवींची मनोधारणा?

**नारद** : महर्षी, लोपादेवींना आपण आपली वधू म्हणूनच प्रकट केले आहे. तेव्हां अन्य कोणताही विचार संभवत नाही. महर्षी आपण तात्काळ विवाह सिद्धीसाठी प्रस्थान करावे.

**महर्षी अगस्त्य** : तथास्तु, आम्ही अगदी उदयिकच ब्राह्ममुहूर्तसमयी प्रस्थान करतो.

**नारद** : नारायण, नारायण, महर्षी आज्ञा असावी.

**महर्षी** : प्रणाम.

**(नारद निघून जातात, महर्षीही जातात. प्रवेश संपतो.)**



# ।। अंक १ ला - प्रवेश ६ वा ।।

(राणीवशात श्री दिव्या चिंतामग्न, दुःखी अवस्थेत बसली आहे. मधूनच ती स्वतःशीच काही पुटपुटते. तिला प्रचंड मानसिक त्रास होतो आहे. तेव्हढ्यात दासी प्रवेशते.)

**दासी** : राजमाता, आपणास थोडे जल देऊ का? बरे वाटेल!

**महाराज्ञी श्री दिव्या** : नको.

**दासी** : असं कसं बरं करून चालेल? आपण राजमाता आहात! मी आपणास काय सांगावे? महर्षी अगस्त्यांकडून; राजकन्यांच्या विवाहाचा प्रस्ताव आल्यापासून पाहाते आहे. आपण अन्नपाणी वर्ज्य केले आहे. माताजी, आपणास काय हवा तो निर्णय घ्या, पण खंबीरपणे उभे राहायला, पोटात अन्नपाणी तर हवे ना?

**महाराज्ञी श्री दिव्या** : म्हणून का मी त्या वृद्ध तपस्व्याला माझी लोपामुद्रा देऊ? (तेवढ्यात विदर्भराज निमी प्रवेशतात. त्यांच्याकडे दासीचे लक्ष जाते.)

**दासी** : अगंबाई महाराज इकडेच आलेत. मी येते हं. मला आज्ञा करा. (श्री दिव्या काहीच बोलत नाही. महाराजांच्या दिशेने पाठ फिरवून फुरगटून बसते.)

**विदर्भराज** : (स्वगत) महर्षी अगस्ती ऋषींचा, अग्निदिव्या लोपामुद्रांशी, विवाह करण्याचा प्रस्ताव आल्यापासून; महाराणी अगदीच अस्वस्थ आहेत. त्यांचे म्हणणे काही चूक नाही. महर्षी अगस्ती अतिवृद्ध तपस्वी ऋषी, त्यात ब्रह्मचारी, सतत सृष्टी, कृषी, जल, प्राणी यांच्या व्यवस्थापनाचे कार्य करण्यात मग्न. आश्रमवासी! लोपामुद्रा नवयौवना, सौंदर्यात प्रत्यक्ष महालक्ष्मीच जणू! महामाया महाकालींनाही लाजवेल अशी, राजऐश्वर्यात वाढलेली, लडिवाळ कन्या. खरेतर तिचे स्वयंवर मांडायला हवे. देशोदेशींचे राजे, महाराजे धावत स्वयंवरास येतील. पण

नियतीने क्रूर चेष्टा केली आहे. मुळात महर्षी अगस्त्यांनी स्वतःसाठी वधू म्हणूनच तिची निर्मिती, जातकयज्ञातून केली. आम्हाकडे केवळ तिचे संगोपन करण्याचे उत्तरदायित्व आहे. आम्ही कसे नाकारणार? विधात्याने, निदान, आम्हा मातापित्यांच्या मातृपितृ भावनांना न्याय नको का द्यायला? राजधर्म आणि गृहस्थधर्म, केवळ दिव्यपरीक्षा असते; हेच खरे! आता महाराणींना कसे बरे समजवावे? पण कर्तव्यकठोर होऊन; तिला समजावणे तर क्रमप्राप्तच आहे. (महाराणींजवळ जाऊन तिच्या खांद्यावर हात ठेवून सद्गदित कंठाने) महाराणी, श्री दिव्या आपण साम्राज्ञी आहात. आपणच असे करून कसे चालेल?

**महाराज्ञी श्री दिव्या** : (फिस्कारून) काही सांगू नका मला, माझ्या काळजाचा तुकडा, मी त्या अतिवृद्ध, उग्र गंध, तपस्व्याला द्यायचा? त्यापेक्षा आपण तिला यज्ञात आहूत करू!

**विदर्भराज** : साम्राज्ञी, असे बोलू नये. आपणास आभाळ कोसळल्याचे दुःख आहे. तसे मलाही आहेच ना? पण...

**महाराज्ञी श्री दिव्या** : आपण चक्रवर्ती सम्राट आहात. इंद्रांशी स्पर्धा करण्याएवढी आपली थोरवी. मग हा जरठकुमारी विवाह नाकारण्याचा निर्णय आपण घेऊ शकत नाही? उपयोग काय असल्या राजसत्तेचा? ते काही नाही, आपण राजदरबार निमंत्रित करून; तात्काळ, हा जरठकुमारी विवाह नाकारण्याचा निर्णय घ्या आणि कळवा त्या महर्षी अगस्त्यांना.

**विदर्भराज** : पण महाराज्ञी त्यांनी तर...

**महाराज्ञी श्री दिव्या** : (त्यांना मध्येच थांबवित) काही सांगू नका. अहो त्या महर्षींनी म्हणे जातकयज्ञातून ही कुमारी स्वतःची वधू म्हणून निर्माण केली. अहो पण हेतू काही असला; तरी महर्षीच कन्यानिर्माता झाले ना? मग ते तर तिचा पिताच ठरतात! पित्याने कन्येशी विवाहाची वांछा करावी; हाच का आपला नीतिधर्म?

**विदर्भराज** : साम्राज्ञी, आपण जरा शांतपणे विचार करा...



**महाराज्ञी श्री दिव्या** : अहो, काय बोलता आहात महाराज हे; सम्राटांना हे अशोभनीय नव्हे का? मी माता आहे लोपामुद्रेची; मी हे कसं सहन करू? (काहीसे विव्हल होत) नाथा सांगाना. मी माता आहे हो... मला हे अगदी सहन होणार नाही – पाहा –

**असो कोणी ऋषी महर्षी तपस्वी वा गभस्ती**
**नच देई मम कन्या नवयौवन रस मंजिरी ।।धृ।।**
**कळे कि ना पातक हे वरे पिता कन्यका?**
**कळे कि ना रीत मान्य कैसी या विधात्या?**
**गंधित मम चाफेकळी कैसी देऊन धतुरफुला?**
**बांधू नका ऐसी गाठ त्यागीन मी प्राणा? ।।**

**विदर्भराज** : श्री दिव्या, असा संताप करून घेऊ नका. असं संतापून, मनःस्ताप करून; कसं बरं चालेल? आपण उभयतांनी महर्षी अगस्त्यांना अभिवचन नाही का दिले? त्याचा शांतपणे विचार करा. आपण महाराज्ञी आहात. दिलेला शब्द पाळणं हा आपला धर्म आहे. धर्माच्या आड, माया येणे बरे नव्हे. नका, नका असा विचार करू. आपण कन्यादानाची तयारी करणं हेच श्रेयस्कर – असं पहा –

**राजधर्म हेच श्रेय समजून घे प्रियतमे**
**नको असा अविचार गुंतूनी माया जाले ।।**
**वचन आम्हा सर्वोपरी**
**सत्व, तत्त्व मनिविचरी**
**तू राज्ञी न्यायदेवी । तोड प्रेम पाशा ।।**

(महाराज श्री दिव्याची समजूत घालत असतांनाच लोपामुद्रा प्रकटते. थेट आईजवळ जाऊन तिचे हात हातात घेऊन लडिवाळपणाने...)

**लोपामुद्रा** : हे काय आई, अजूनही तुझ्या मनातले विचार जात नाहीत. आई कितीगं माया करशील! हो, हो मी तुझीच कन्या आहे. अगदी तुझीच! पण आई, तूच ना म्हणतेस 'कन्या परक्याची असते'? तूच ना परोपरीने मला स्वयंवरासाठी तयार करीत होतीस? आई, अगं माझा स्वयंवराचा विचार करणं, हे घोर पाप आहे! अगं, माझा जन्मच मुळी महर्षी अगस्त्य भार्या

म्हणून झाला आहे. आई, दिव्य जातकयज्ञातून, या विश्वाच्या कल्याणासाठीच तर; मला समस्त मातृकांच्या शक्ती एकवटून प्रकटावे लागले. आई, अगं तुझी ही कन्या, कोणी सामान्य राजकन्या नाही. मी तर या सृष्टीच्या समस्त जातक परंपरेचे नियमन करण्यासाठी, महर्षी शिवस्वरूप अगस्त्य संकल्पाने सिद्ध झाले आहे! महर्षी अगस्त्य कोणी जरठ तपस्वी नाहीत. आम्ही उभयता चिरतरुण आहोत. पंचतत्त्वे जशी चिरतरुण आहेत; तसेच अगस्त्य आणि लोपामुद्रा चिरतरुण आहेत! पिताश्री, माते, महर्षी अगस्त्यांविषयीचा घृणास्पद विचार सोडून द्या. तुझ्या मनोकामनेप्रमाणे, अगस्त्य महर्षींना माझे पाणीग्रहण करण्यासाठी निमंत्रित करा. आपण उभयता माझे मातापिता आहात, या सृष्टीकन्येचे आपण कन्यादान करून कृतार्थ व्हा!

**विदर्भराज** : हे प्रिय कन्ये, तुझे बोलणे म्हणजे ब्रह्मवाणीच वाटते! परंतु आम्ही तुझे मातापिता आहोत. महाराज्ञींना वाटणारच!

**लोपामुद्रा** : (पुन्हा आईचे हात हातात घेऊन, तिचे नेत्र टिपत) आई आवर बघू स्वतःला. अगं, तू मांडलेल्या माझ्या जन्मोत्सवापेक्षाही, हा पाणीग्रहण सोहळा अपूर्व आणि जगद्वन्द्य आहे. सोडून दे तुझी भय शंका आणि विवाह सोहळ्याची तयारी कर... मला तर हा सृष्टीच्या नाविन्यपूर्ण जातकयज्ञाचा मंगल प्रारंभ वाटतो आहे! आई हा माझा आनंद तू हरवणार आहेस का? हास बघू अशी- आई बघ बरं- केव्हढे हे सृष्टीवैभव -

**माते तव कन्येचा उत्सव नवसृष्टीचा**
**सृष्टीसखी मातेच्या सृजनवैभवाचा ।।धृ।।**
**विश्ववंद्य होय आता वैदर्भी कन्यका**
**श्री दिव्या शोभतसे अग्निदिव्या माता**
**त्रैलोक्य उत्सुकसे पाहण्या शुभमंगला**
**मातापिता करिती सफल जातका व्रताला ।।१।।**
**ब्रह्मर्षी ऋषी अगस्त्य सिद्ध होत सृजनार्थ**
**शक्तीस्वरूप लोपा ही वरण्यासी हो उत्सुक**
**विश्वाच्या विभ्रमास येई नव जात रूप**



**विदर्भराज दिव्यराज्ञी योजी परिणयाला ।।२।।**

(गाणे संपतानाच प्रवेश ५ वा, अंक पहिला समाप्त होतो. पडदा पडत असतांना मंगलवाद्यांचा गजर होत राहावा. विवाह संपन्न व्हावा. अगस्त्य आणि लोपामुद्रा एकमेकांना हार घालतात, हे दाखविण्याचा प्रयत्न करावा.)

●●●

# ।। अंक २ रा ।।

## ।। प्रवेश १ ला ।।

(पडदा उघडतो तेव्हां पहिल्या अंकातील अगस्ती आश्रमाचा आभास पुन्हा दिसतो. शिवगण काल आणि अवकाश दोघे गप्पा मारत प्रवेशतात.)

**अवकाश** : प्रभू शिवांनी, आश्रमात पाठविल्यापासून, आपण येथेच वास्तव्य करून आहोत. आपल्याला, कैलासात परत जाणे, केव्हा घडणार आहे कोण जाणे?

**काल** : तू म्हणतोस ते अगदी खरे. महर्षी अगस्त्यांचा जातकयज्ञ तथा गोत्रस्थापन विधी, संपन्न झाल्यावरच आपली सुटका होणार. अरे अवकाश, एक मात्र खरे हां.

**अवकाश** : काय?

**काल** : त्रैलोक्यातही झाला नसेल; असा भव्यदिव्य विवाहसोहळा अमरावतीत, अनुभवायला मिळाला. ब्रह्मलोक, विष्णूलोक, शिवलोक, देवेंद्राचा स्वर्गलोक, एवढेच काय; जणू चराचर त्या विवाहात मोठ्या उत्साहाने समाविष्ट झाले होते. सर्वांच्या मुखी नुसते महर्षी अगस्त्य विवाहाचे कौतुक ऐकायला मिळत होते. अवकाशा, मला वाटतं प्रत्यक्ष विश्वनाथांचाही विवाह सोहळा एवढा वैभवसंपन्न झाला असेल का?

**अवकाश** : हो ना. खरंच अनेकांना उमा-महेशाच्या विवाहाचाच भास होत होता. पण काय उपयोग?

**काल** : होय रे, काय उपयोग? पाणीग्रहण झाले खरे परंतु जातकयज्ञ काही संपन्न होत नाही!

**अवकाश** : हो ना, महर्षी अगस्त्य आणि महर्षी लोपादेवी दोघेही आपल्या सृष्टी व्यवस्थापन, गुरुकुल चालन आणि तपातच मग्न आहेत. विवाह होऊनही दोघे विरक्तच! मग जातकयज्ञ घडणार कसा?

**काल** : गेले अनेक मास तर ते दोघे विजनवासात आपापल्या तपोस्थळीवर तपमग्न आहेत.

**अवकाश** : समाधीयोग सिद्ध झाल्यावर, किती काळ लोटेल, सांगता येत नाही.

**काल** : गुरुकुलात कुजबुज मात्र मोठी गंमतीशीर ऐकायला मिळते. मला तर हे सगळेच कठीण दिसते.

**अवकाश** : होय रे. कधी देवी रतीरंगी अवतरतात; त्या वेळी म्हणे महर्षी वैराग्यवश असतात.

**काल** : हो ना कधी महर्षी मिलनोत्सुक होतात; तर देवी वैराग्यव्रती असतात.

**अवकाश** : होय रे. प्रभूशिवांनी ज्यासाठी महर्षी अगस्त्य आणि महर्षी लोपामातांची, सृष्टीचलनाच्या नवपर्वासाठी योजना केली; ते कसे सफल होणार?

**काल** : की महर्षी आणि महर्षी माता पुन्हा महर्षी अगस्त्यांनी मांडला होता तसा जातकयज्ञ मांडणार?

**अवकाश** : सगळे तर्काच्याच पलिकडे आहे. आपल्याला कैलासात जाण्याचा योग केव्हां येतो कोणास ठावूक? गेली अनेक तपे केवळ प्रतीक्षाच सुरू आहे.

**काल** : होय रे, येथे आपल्याला, तपसाधना, सेवाव्रत यात काही कमी नाही हे खरे. एवढेच काय कैलासावरील सर्व सुविधा येथेही आहेत.

**अवकाश** : होय रे, पण एक कमी आहे?

**काल** : कोणती?

**अवकाश** : देवलीला कोणत्या सुरू आहेत; ते कळत नाही. मुख्य शिवगणांतील स्पर्धेला आपण पारखे झालो आहोत. त्यामुळे गंमत येत नाही.

**काल** : हो ना त्याशिवाय महर्षींच्या सेवेची आणि आश्रमाची जबाबदारी आपल्यावर आहे हे खरं. म्हणूनच तर महर्षींचा जातकयज्ञ लवकर संपन्न व्हावा यासाठी आतूर झालो आहोत.

**अवकाश** : अरे, आपले एक सोड, अगस्त्य अनुगामिनी गोत्रज, अनेक पिढ्यांतील संताने, अधांतरी आहेत, त्याचे काय? त्यांना मुक्ती द्यावी म्हणून तर ही जातकयज्ञ लीला मांडली ना?

**काल** : होय रे. ते तर सारखे ब्रह्मर्षी विष्णूभक्त नारदांना साकडे घालीत असतात. तरी काहीच कसे घडत नाही?

**अवकाश** : श्रीमद् नारदांच्या कौशल्याने खरे तर काहीच अशक्य नाही. (तेवढ्यात ब्रह्मर्षी नारद नारायण मंत्राचा जप करीत प्रवेशतात)

**नारद** : नारायण, नारायण.

**काल आणि अवकाश** : नारदमुनी आपण; (दोघे वाकून झुकून दर्शन घेतात)

**अवकाश** : आम्ही आपलेच स्मरण करीत होतो.

**नारद** : नारायण नारायण, म्हणूनच आम्ही प्रकटलो, नारायण नारायण, काल, अवकाश, त्वरित कामाला लागा. महर्षी अगस्त्यांची कुटी यथोचित सजवा. आश्रमात स्वागतोत्सव करा.

**काल** : म्हणजे, मी नाही समजलो?

**नारद** : नारायण, नारायण, अरे काल, अवकाश, महर्षी अगस्त्य आणि लोपामुद्रादेवी जातकयज्ञ करण्यास तयार झालेत!

**अवकाश** : (घाबरून) म्हणजे, म्हणजे महर्षींनी मातांच्या निर्मितीसाठी केला होता तसा?

**नारद** : नारायण, नारायण, नव्हे नव्हे, प्रजापतींच्या मार्गाने, रतीसुखास दोघेही तयार झाले आहेत, नारायण नारायण.

**काल आणि अवकाश** : काय म्हणता? केवढी ही आनंद वार्ता! म्हणजे आता आम्ही, कैलासात जायला मुक्त होणार?

**नारद** : नारायण नारायण, चला लवकर कामाला लागा. उभयतांच्या स्वागताची तयारी करा, चला.

**काल आणि अवकाश** : होय होय मुनिवर, चिंता नको, चला.

(तिघेही जातात मंचावर अंधार)

**अंक २ रा प्रवेश १ ला समाप्त**

●●●

## *।। अंक २ रा - प्रवेश २ रा ।।*

(अगस्त्यांच्या कुटीतील शयनगृहातील प्रसंग. लोपामुद्रा वल्कले नेसलेली अर्थात साधे सुती वस्त्र परिधान केलेली. दंडात, मनगटात रुद्राक्षमाला, गळ्यात रुद्राक्षमाला आणि सोबत फुलमाला परिधान केली आहे. ऋषीपत्नी, आश्रम माता, परंतु देखणी तारुण्यसुलभ हालचाली करणारी असावी. केशसंभाराला गंधित फुलमाला आहेत तशा गळ्यात, दंडाला, मनगटांनाही रुद्राक्षांबरोबर सुगंधी फुलमालांनी शृंगार केला आहे. पायात मात्र साखळ्या आहेत. काचोळी शेला आणि कमरेला अशी सर्व धूतवस्त्रे परिधान केली आहेत. ती शयनगृह सजविण्याचा प्रयत्न करते आहे. तेवढ्यात ऋषी अगस्त्य येतात. लोपामुद्राच्या मागे येऊन उभे राहतात. प्रसन्न खोडकर मिश्किल मुद्रा. लोपामुद्रांना चाहूल लागते तशी गडबडीने)

**लोपामुद्रा** : अगं बाई, ऋषीवर आपण, कधी आलात कळलंच नाही. (लाजत थोडी दूर जाते)

**महर्षी अगस्त्य** : आपण जातकयज्ञाच्या विचारात मग्न होतात, तेव्हांच...

**लोपामुद्रा** : पण असं लपतछपत येऊन कशाला उभं राहायचं. मी केव्हढी दचकले. (हे सगळे लटकेपणाने)

**महर्षी अगस्त्य** : हे बरं आहे. देवी आपल्या शृंगारानं मला आकर्षून आणलं, मग सूचना देण्याचं भानच राहिलं नाही! (पुढे होऊन लोपामुद्रेच्या खांद्यावर हात ठेवतात) देवी आपल्या या संमोहक मुद्रेने अक्षरशः मला ओढून आणलं. (असं म्हणत गोऱ्यामोऱ्या लाजऱ्या झालेल्या लोपामुद्रांची हनुवटी हळूवारपणे उचलत त्यांच्या चेहऱ्यासन्मुख होत) प्रिये, काय हे अप्रतिम लावण्य काय हे तेजःपुंज सौंदर्य! (असे म्हणत तिला आलिंगन देण्यासाठी आपल्याकडे ओढतात.)

**लोपामुद्रा** : (अधिक अनुरक्त होत, लटकेपणाने अगस्त्यांचे हात झटकून त्वरेने लांब जाऊन; पुन्हा पाठमोऱ्या उभ्या राहात.) नाथ, असा उतावळेपणा बरा नव्हे!

**महर्षी अगस्त्य** : धन्य धन्य! प्रिये, हे मात्र देवेंद्रांच्या अप्सरांपेक्षाही नवयौवन शृंगारअधिक आकर्षित करते. प्रिये... (असं म्हणत लोपादेवींकडे जातो)

**लोपामुद्रा** : हां हां नाथ, असं अधीर होऊ नये. (अधिक लाडिक आव्हानात्मक कटाक्ष अगस्त्यांकडे टाकते.)

**महर्षी अगस्त्य** : देवी, हे मात्र, आपलं काही वेगळंच. काल, जातकयज्ञासाठी, आम्ही सिद्ध व्हावं म्हणून परोपरीनं आम्हाला समजावून सांगणाऱ्या देवी; आज आम्हालाच अधीर होऊ नये म्हणून सांगत आहेत (असं म्हणत पुन्हा पुढे सरसावून आवेगाने लोपादेवींचे हात हाती घेत, त्यांना आपल्याकडे ओढण्याचा प्रयास करतात. अगस्त्य खरोखरीच अधीर झाले आहेत.)

**लोपामुद्रा** : (आपले हात सोडवून घेत काहीशा निग्रहानं) प्राणनाथ जातकयज्ञ करावा हा माझा हट्ट आहे हे खरं, पण अशा वल्कलांच्या वैराग्यशाली विळख्यात; ते कसं शक्य आहे?

**महर्षी अगस्त्य** : काल तर माझ्याकडून जातकयज्ञ करण्याचं वचन घेतलंत? आता हे विपरीत बोलणं का बरं?

**लोपामुद्रा** : होय, मी ही जातकयज्ञ करण्यासाठी सिद्ध आहे परंतु नाथ...

**महर्षी अगस्त्य** : प्रिये, असे कोड्यात का बरं बोलत आहेस, माझ्या कामविव्हल, जातकोत्सुक प्रियाराधनेला असा अवरोध का बरं?

**लोपामुद्रा** : नाथ, आपल्याला आनंद देणं, हे तर माझं परमकर्तव्य आहे, परंतु नाथ, आपल्या ऋषीवृत्तीचा अनुसार करण्यासाठी मी अवघे राजवैभव सांडून; आपणाशी विवाह केला. राजशृंगार विसर्जित करून; माझ्या यौवनोत्सुक संवेदना हरवल्या. मीही

तपमग्नतेचा अनुसार केला. गोत्रजांना मुक्ती देण्यासाठी आणि सृष्टीसतीच्या चक्रनेमीक्रमाला सहाय्यभूत होण्यासाठी मी जातकयज्ञाला सिद्ध झाले. परंतु... परंतु...

**महर्षी अगस्त्य** : (काहीसा धक्का बसला आहे. अधीरता संपली आहे) परंतु परंतु काय देवी?

**लोपामुद्रा** : मला राजवैभवातील राणीवशाची भावना होते आहे. राजमहालातील, त्या शृंगारसुलभ, वैभवसंपन्न, कामोत्तेजक, शयनगृहाची, राजकुमारींच्या रतीशृंगाराची आसक्ती मला निर्माण झाली आहे. ही वल्कले मी कशी धारण करावी?

**वाटेमज भुषवावे राजपाट वैभवा**
**शृंगारून तनुमनास लेऊनी राजभूषणा ।।धृ।।**
**रत्नजडित शृंगभोग**
**थटूनी राजकन्येसम**
**गंधमधुर मधुधुंद**
**सजवुनी हा जातक मंच**
**कमरपटीनाभीहीरा आवाही रतीमेखला ।।१।।**
**शिरभुषण कर्णफुले**
**गळाभरूनी हार रुळे**
**नादकरिती पद भुषणे**
**शालूसह शेलाही झुले**
**आलिंगुनी सफल करू जातकयज्ञाला ।।२।।**

**महर्षी अगस्त्य** : लोपामुद्रे, आपण काय म्हणता आहात? हे कसे शक्य होणार?

**लोपामुद्रा** : (काहीसे उसळून) का, का शक्य नाही?

**महर्षी अगस्त्य** : कांते, मी तपस्वी ऋषी, आम्हाला राजऐश्वर्य अगदी वर्ज्य. मी हे राजवैभव कसे आणू?

**लोपामुद्रा** : नाथ, हा माझा प्रण आहे असे समजा. आपण राजऐश्वर्य घेऊन आल्याशिवाय; हा जातकयज्ञ शक्य नाही!

**महर्षी अगस्त्य** : पण दिल्या घेतल्या वचनांचे काय?



**लोपामुद्रा** : महर्षींनी समुद्रप्राशन केले आहे, विंध्याचे गर्वहरण करून; सूर्यचंद्रांचा प्रदक्षिणेचा मार्ग मोकळा केला आहे!

**महर्षी अगस्त्य** : होय देवी, पण ते परोपकारार्थ. स्वभोगासाठी नव्हे.

**लोपामुद्रा** : आपण जातकयज्ञ मांडणार आहोत, तेही परोपकारासाठीच. आपल्यासारख्या साक्षात ब्रह्ममानसपुत्राला अशक्य ते काय?

**महर्षी अगस्त्य** : परंतु देवी, मी व्रतस्त तपस्वी आहे, मी कोणाकडून माझ्या भोगासाठी धन कसे मिळवू?

**लोपामुद्रा** : हे ऋषीवर, विश्वाला शासन करण्याची आपली पात्रता, प्रत्यक्ष ब्रह्माविष्णूमहेशांची शक्ती आपणात आहे; हे आपण विसरून; एवढ्या क्षुल्लक गोष्टीसाठी हतबलता दर्शविता? धिक् तुमचा पुरुषार्थ! माझा एवढाही प्रण जर आपणाकडून पूर्ण होणार नसेल तर; आपले अवघे पौरुष व्यर्थ म्हणावे लागेल!

**महर्षी अगस्त्य** : हे त्रैलोक्य ज्ञानसम्राज्ञी, असे सामान्य सुखोपभोगकांक्षी स्त्रीसारखा, हट्ट करू नये. (अगस्त्य काकुळतीला आले आहेत)

**लोपामुद्रा** : ते मला काही माहीत नाही. आपण पराक्रमाचा संचार करून ऐश्वर्य प्राप्त करावे, हीच माझी कांक्षा, हाच माझा प्रण!

**महर्षी अगस्त्य** : ठीक आहे, तथास्तु! मात्र एक लक्षात ठेव हे घडण्याचे विधिलिखित असेल; तरच ते शक्य होईल. अन्यथा आपल्या वचनांच्या विफलतेची जबाबदारी तुझ्यावर असेल?

**लावण्य सुंदर मदनमंजिरी काय देऊ तुला?**
**माझे विश्वच सर्व अर्पिले सखे प्रेम फुला,**
**माझ्या प्रेमफुला ।।धृ।।**
**लाभ व्हावा तुला राजवैभवाचा नको राग धरू माझा**
**होऊ दे तुझी पूर्ण इच्छा येईल क्षण मीलनाचा**
**होतो सिद्ध मी मान ठेवून तुझ्या संकल्पाला ।।१।।**
**विश्व कल्याणार्थ आपण सज्ज होऊया कार्याला**
**दुष्टांचा विनाश करूनी सशक्त करूया सृष्टीला**
**अशक्य ही शक्य करतील अगस्ती तनमनधन अर्पूनि तयाला**
**परोपकारार्थ जातकयज्ञ करू आपण सफला ।।२।।**

**लोपामुद्रा** : (आनंदाने) महर्षी, म्हणजे आपण माझा प्रण पूर्ण करणार? हे नाथ, मला गगनात मावणार नाही एवढा आनंद झाला आहे. तुम्ही पौरुष संपादनात नक्की यशस्वी व्हाल. हेच विधिलिखित आहे.

**महर्षी अगस्त्य** : महर्षी लोपामुद्रे माझीही एक अट आहे.

**लोपामुद्रा** : काय ऋषीवर?

**महर्षी अगस्त्य** : मी परत येईपर्यंत, तू माझ्या प्रतीक्षेत येथेच तिष्ठत असावे.

**लोपामुद्रा** : महर्षे, नाथ, मी आपली वाट पाहीन!

**महर्षी अगस्त्य** : तथास्तु. (आवेशाने बाहेर पडतात. मंचावर अंधार दाटतो.)

**अंक २ रा प्रवेश २ रा समाप्त**

•••

## ।। अंक २ रा - प्रवेश ३ रा ।।

(रंगमंच प्रकाशतांना मंचावर सिंहासनाच्या उजव्या बाजूला आणखी एक सिंहासन आहे. हे सिंहासन महामंत्री वातापीचे. त्याच्या समोर सरसेनापती ज्वालामुखीचे, मध्यभागी सिंहासनावर महाराज दानवशिरोमणी इल्वलाचे आहे. तिघे विराजमान आहेत. ते तिघेही काही खलबत करीत आहेत. त्यांच्या अवतारावरून ते राक्षसराज आहेत हे स्पष्ट जाणवते. प्रत्येकाच्या सिंहासनाशेजारी भव्य खड्ग ठेवलेले दिसते. अतिथी आणि राजदरबारींसाठी वेगळी स्थाने आहेत.)

**इल्वल** : (ढगांच्या गडगडाटासारखा हसत) या इल्वल आणि वातापींच्या हातून कोणीही ऋषी सुटला नाही. याचना करीत आलेला प्रत्येक, आपला देह आणि ज्ञान यांसह, गुरुकुलच आम्हाला देऊन गेला. या दक्षिणापथावर आता केवळ आमचे राज्य आहे. प्रकांड ज्ञानाने हा दक्षिणापथ आता तेजाने झळाळतो आहे. पृथ्वीवरील असंख्य भूपति, आता आमचे अंकित आहेत. (पुन्हा गडगडाटासारखा हसतो.) सेनापती, आपण आणलेल्या सुवार्तेने आम्ही प्रसन्न आहोत. प्रत्यक्ष शिवस्वरूप महर्षी अगस्त्य आमच्याकडे याचक म्हणून येत आहेत. ज्यांच्या भयाने त्रैलोक्य कापते; असे आम्ही ऐकून होतो; ते महर्षी अगस्त्य आमच्यापुढे याचक!! (पुन्हा गडगडाटासारखे हसत) वातापि आपल्याला ब्रह्महत्येची श्रेष्ठतम संधी आपसुक चालून आली आहे. आपण तयार आहात ना?

**वातापि** : दानवशिरोमणी इल्वल महाराज, माझ्या योगबल प्रयोगाचा मुकुटमणीच महर्षी अगस्त्यांच्या रूपाने चालत येत आहे. आपण काळजीच करू नका. आजवर लक्षावधी ऋषींच्या उदरात आम्ही स्वतः समीश बळी बनून प्रवेश केला. आमच्या उदरातील विहाराने तृप्ततेची ढेकर देत, उठलेल्या ऋषींचे प्राण आणि ज्ञान हिरावून; आपल्या एका हाकेसरशी; त्यांचेच उदरविदारून; त्यांना आम्ही कालस्वाधीन केले! (मोठ्याने हसतो) महाराज आतातर ऋषीणाम ऋषी, म्हणविणारे, आपल्या पायांनी आम्हांपर्यंत आले आहेत. त्यांच्याकरिता सुग्रास भोजन होण्याचे भाग्य मला लाभेल. आपण त्रैलोक्य सम्राट व्हाल; यात मला तीळमात्र शंका नाही. (पुन्हा हसतो)

**इल्वल** : धन्य, धन्य, वातापि! आपल्या आत्मविश्वासाने, आम्हाला, आताच त्रैलोक्याधिपती झाल्यासारखे वाटत आहे.

**सेनापती ज्वालामुखी** : क्षमा असावी महाराज, सेनापती म्हणून मला आपणास सावध करणे आवश्यक वाटते.

**इल्वल** : का? कोणते भय आहे? आता भयालाच आमचे भय वाटेल; सेनापती वृथा शंका नको. आम्ही त्या अगस्तीला कालवश करणार हे नक्की! (पुन्हा गडगडाटासारखा हसतो.)

**सेनापती ज्वालामुखी** : क्षमा महाराज, आपणच सांगतांना; कोणताही शत्रू कमी लेखू नये.

**इल्वल** : (तुच्छतेने) ती रणनीती झाली! त्याचे काय?

**सेनापती ज्वालामुखी** : महाराज, महर्षी अगस्त्य हे ब्रह्माविष्णूशिव या त्रिविध शक्तींनी शक्तिमान असे, भगवान शिवस्वरूप आहेत. त्यांनी समुद्रप्राशन करून; अखिल दानवांचा नाश करण्यास, कसे सहाय्य केले याचे स्मरण आहेना? म्हणूनच सावध असावे!

**इल्वल** : महर्षी अगस्त्यांनी दानवकुळाचा नाश करण्यास सहाय्य केले; याचाच तर सूड आम्ही घेत; सर्व ऋषींना ठार करण्याचा विडा उचलून; हे कार्य करीत आहोत. आता प्रत्यक्ष महर्षी अगस्त्य येत आहेत. त्यांची अंत्ययात्रा सुरू झालीच म्हणून समजा. (गडगडाटासारखा हसतो) तेव्हढ्यात सेवक येऊन महर्षी आल्याची सूचना देतो.

**सेवक** : प्रणाम महाराज, महर्षी अगस्त्य द्वारापर्यंत आले आहेत.

**इल्वल** : वा वा, शुभघडीला अवकाश नको. वातापि, सेनापती ज्वालामुखी आपण जाऊन, त्यांना घेऊन या. आम्ही येथे त्यांचे स्वागत करण्यास सिद्ध होतो. (वातापि आणि सेनापती जातात. इल्वल आपले उत्तरीय अर्थात अंगावरचा शेला दोन्ही हातात धरून दरबाराच्या प्रवेशापाशी येऊन उभा राहतो. अगस्त्यांच्या, अतीव प्रेमपूर्वक आदरातिथ्याचे, नाट्य सुरू होते. महर्षी अगस्त्यांना घेऊन वातापि सेनापती काही क्षणातच येतात. मंचावर महर्षी प्रवेशताच त्यांच्या पायावर मस्तक ठेवून इल्वल प्रणाम करतो. महर्षींच्या खांद्याला झोळी, एका हातात कमंडलू आहे.)

**महर्षी अगस्त्य** : ऐश्वर्यमस्तु! मोठ्या प्रेमभराने आशीर्वाद देतात.

**इल्वल** : त्रिकालज्ञ, शिवस्वरूप महर्षी अगस्त्य महाराज, आपण आमच्या सिंहासनावर आरूढ होऊन; आम्हाला कृतकृत्य करावे.

**महर्षी अगस्त्य** : सम्राट इल्वला, आम्ही खरे तर सिंहासनाचे अधिकारी नाही; तथापि जातकयज्ञासाठी स्वीकारलेल्या, या वृत्तीमुळे, आपली इच्छा आम्ही पूर्ण करतो. परंतु...

**इल्वल** : परंतु काय ऋषीवर?

**महर्षी अगस्त्य** : (इल्वलाच्या सिंहासनावर बसतात आणि बोलू लागतात तेव्हां तिघेही आज्ञांकिताप्रमाणे हात जोडून उभे आहेत.) इल्वला, आम्ही राजवैभवासाठी धनाची याचना करीत भ्रमण करीत आहोत.



**इल्वल** : ऋषीवर, हे समस्त राज्य आमच्यासह सेवेत उपस्थित आहे. आपण स्वीकार करून; आम्हाला उपकृत करावे.

**महर्षी अगस्त्य** : सम्राट इल्वला, उताविळ होऊ नकोस. आमचे एक व्रत आहे. ते तुम्हाला पाळावे लागेल.

**इल्वल** : सांगा ऋषीवर आम्ही आपल्या आज्ञेबाहेर नाही.

**महर्षी अगस्त्य** : राज्यातील समस्त प्रजेच्या आणि राजव्यवस्थेच्या आवश्यक गोष्टी भागवून, उर्वरित धनातूनच आम्हास यथाशक्ती भाग द्यावा. प्रजेला वंचित ठेवू नको.

**इल्वल** : ऋषीवर, आपल्या व्रताचे पूर्ण पालन करू. आपण स्वस्थ असावे. आपले यथोचित भोजन वस्त्रादि आतिथ्य, करण्याची संधी, आम्हाला आपण द्यावी; अशी आमची प्रार्थना आहे. ते आटोपले; की आपणास हवे ते, हवे तेवढे आपल्या व्रतास अनुसरून घेऊन जावे.

**महर्षी अगस्त्य** : तथास्तु!

**इल्वल** : सेनापती ज्वालामुखी, वातापि त्वरित पुढे होऊन महर्षींच्या पाद्यपूजादि आणि भोजनादिंची उत्तम व्यवस्था करावी. आम्ही ऋषीवरांना अतिथी कक्षात विश्रांतीसाठी घेऊन जातो. (वातापि सेनापती तातडीने पुढे जातात. मोठ्या स्वागतशीलतेने इल्वल महर्षींना घेऊन जातात. मंच रिकामा. मंगल वाद्य गजर निनादत राहतो. क्षणभरातच सेनापती रंगमंचावर येतात.)

**सेनापती ज्वालामुखी** : (फेऱ्या मारता मारता) (स्वगत) महर्षी अगस्त्यांना ठार मारणे केवळ अशक्य वाटते. सूर्यदेवांना कोणी ठार करू शकला का? धरणीने आकाशावर कधी विजय मिळविला काय? वाऱ्याला कोणी साखळदंडाने बंदिस्त केले काय? मग महर्षी अगस्त्यांसारख्या, ब्रह्ममानसपुत्राला, ठार करणे कसे शक्य आहे? महर्षी रूप सौम्य असले; तरी महर्षींचे कार्य शिवांप्रमाणे

प्रलयंकारी आहे. महाराज इल्वलांना सद्बुद्धी होवो. परंतु हे तरी कसे शक्य आहे? महर्षींच्या आगमनानंतर त्यांचा अहंकार सातव्या आकाशात पोचला आहे. महर्षी अगस्त्यांना शरण जाणे हेच श्रेयस्कर! अन्यथा सर्वनाशास निमंत्रण हेच खास. असो, सेनापती या भूमिकेतून, मला समग्र संरक्षणाची व्यवस्था केली पाहिजे. परंतु महाराज इल्वल, प्रधानजी वातापि आणि महर्षी अगस्त्यांच्या योग सिद्धीबल-संघर्षाचे काय? समस्त सैन्य, समरासाठी सज्ज ठेवणेच आपल्या हाती. पण भयशंका मनाला बंबाळ करते आहे; एवढे मात्र खरे! त्वरेने पुढे जाऊन; सज्ज होणेच योग्य! (चिंतामग्न आणि कर्तव्यदक्षतेने दमदार पावले टाकीत खड्ग उंचावत निघून जातो. पुन्हा मंगलवाद्ये वाजू लागतात आणि इल्वल महर्षींना मोठ्या नम्रतेने मंचावर घेऊन येतो. अगस्त्यांना पुन्हा आपल्या सिंहासनावर बसवितो. हात जोडून नम्रपणे उभा राहतो.)

**महर्षी अगस्त्य** : सम्राट इल्वला, आपल्या अतिथ्याने आम्ही प्रसन्न आहोत. प्रथमच आम्ही एव्हढ्या चविष्ट समीश भोजनाचा लाभ घेतला.

**इल्वल** : आम्ही कृतज्ञ आहोत, महाराज. आता आपणास हवे ते ऐश्वर्य आपण घ्यावे. आम्ही देण्यास उत्सुक आहोत. वातापि तिकडेच व्यवस्था करण्यासाठी गेले आहेत. आम्ही त्यांना त्वरित निमंत्रित करतो.

**महर्षी अगस्त्य** : हे उत्तम. (असं म्हणत उदरावरून हात फिरवत तृप्ततेचे ढेकर देतो. मिश्किलपणे) वातापींना त्वरेने बोलवा. केव्हा आपणाकडून धन प्राप्त करून; आम्ही प्रस्थान करतो आहोत; असे झाले आहे.

**इल्वल** : एवढी त्वरा नसावी ऋषीवर. आपल्या सहवासाचा लाभ आम्हाला चिरंतन लाभावा असे वाटते आहे. (असे म्हणत वातापींना हाक मारू लागतात. वातापींना तीन हाका मारूनही वातापि येत नाहीत.)

**महर्षी अगस्त्य** : कोठे दूर तर वातापि गेले नाहीत ना?



**इल्वल** : नाही नाही ऋषीवर, ते अगदी समीपच आहेत. (पुन्हा हाका मारू लागतो. एक, दोन, तीन, चार, पाच, सहा, सात हाका अधिरतेने एकापाठोपाठ मोठ्याने अधिकाधिक त्रस्तच होत मारत राहातो. संताप आणि व्याकुळता इल्वलाच्या चेहेऱ्यावर स्पष्ट दिसते आहे.)

**महर्षी अगस्त्य** : (सिंहासनावरून उठत आवेशाने) महामूर्ख इल्वला, आता वातापि कधीच परत येणार नाही!

**इल्वल** : (खवळून किंचाळत) का ऽ य?

**महर्षी अगस्त्य** : माझ्या उदरात तो पचून गेला.

**इल्वल** : (पुन्हा भयग्रस्त तरी किंचाळत) का ऽ य?

**महर्षी अगस्त्य** : किंचाळू नकोस. वातापीला, योगबलाने, ऋषींच्या उदरात, समीश भोजन स्वरूपात घालून, त्यांचे उदरविदारून ऋषींना ठार करून; त्यांचे ज्ञान आणि तप हिरावून घेण्याची, अघोरी क्रीडा, आता संपली आहे. जगाचे शोषण करून मिळविलेले हे राज्य, भोगून उन्मत्त झालेल्या इल्वला; मला ठार करण्याचा तुझा कट उधळला गेला आहे. आता तू शरण ये अन्यथा...

**इल्वल** : (मोठ्याने ओरडत) अन्यथा, आता तुलाच यमसदनाला पाठवतो. (असे म्हणत इल्वल थेट अगस्त्यांच्या अंगावर आसनाजवळचे खड्ग घेऊन त्वेषाने चालून जातो. क्षणभर एक पाऊल मागे घेऊन; महर्षी अगस्त्य भयग्रस्त झाल्याचा आभास निर्माण करतात. ते पाहून अधिक त्वेषाने इल्वल विकट हास्य करीत) तू दानवांचा नाश करणार, घे भोग आता (म्हणत एकदम सर्वशक्तीनिशी खड्गाचा प्रहार करतो. त्याचवेळी मोठ्या कौशल्याने इल्वलाच्या छाताडावर अगस्त्य मुष्टीप्रहार करतात. त्या वज्रप्रहाराने इल्वल गतप्राण होऊन कोसळतो. (हा प्रसंग घडत असतांना लाईट आणि म्युझिक यांच्या सहाय्याने प्रलयंकर युद्धाचा भास निर्माण करावा. इल्वल पडताच रंगमंचावर अंधार होतो.)

**अंक २ रा प्रवेश ३ रा समाप्त** ●●●

## ।। अंक २ रा - प्रवेश ४ था ।।

(अगस्त्यांच्या कुटीतील शयनगृह दिसते आहे. अगस्त्य आणि लोपामुद्रा मिलनोत्सुक आहेत.)

**लोपामुद्रा** : नाथ, आपल्या पुरुषार्थाने मी दिपून गेले. माझे मनोरथ पूर्ण तर झालेच पण शोषकांचा विनाशही झाला.

**महर्षी अगस्त्य** : देवी तुमचा अंतरीचा हेतु का मला ठावूक नव्हता?

**लोपामुद्रा** : आपण त्रिकालज्ञ आहात. आपल्याला ठावूक नाही; असे कसे होईल? मी सती मातांसारखी भाग्यवान आहे! नाथ मला आपण स्वतः वधू म्हणून निर्माण केलेत.

**महर्षी अगस्त्य** : परंतु देवी, आपल्या गोत्रजांचा उद्धार करण्यासाठीचे कार्य (रोखून उत्तेजकतेने पाहात) अजून अपूर्ण आहे.

**लोपामुद्रा** : नाथ! (लाजेनं चूर होत) असं काय ते?

**महर्षी अगस्त्य** : प्रिये, जातकयज्ञाची शुभघडी प्राप्त झाली आहे. परंतु...

**लोपामुद्रा** : परंतु काय, नाथ (भयशंकाग्रस्त)

**महर्षी अगस्त्य** : अं. अं. भय नको, मी काही तपश्चर्येला नाही निघालो. आता जातकयज्ञ पूर्ण झाल्याखेरीज जायचे नाही; असा निश्चयच केला आहे. मग तर झालं (जवळ जातो)

**लोपामुद्रा** : (काहीशी लांब जात, मोहरल्या नजरेनं पाहात) आता मी काय म्हणणार?

**महर्षी अगस्त्य** : पण मला असं विचारायचं आहे...

**लोपामुद्रा** : काय ते?

**महर्षी अगस्त्य** : आपणास पुत्र हवा की पुत्री?

**लोपामुद्रा** : इश्य हे काय विचारणं, विधिलिखितात असेल ते.

**महर्षी अगस्त्य** : देवी हे तर सांगा-

**सहस्रं ते ऽ स्तु पुत्राणां शतं वा दशसंमितम् ।**
**दश वा शततुल्याः स्युरेको वापि सहस्रवत् ।।**
**सहस्रांसंमिताः पुत्र एको मेऽस्तु तपोधन ।**
**एको हि बहुभिः श्रेयान् विद्वान् साधुरसाधुभिः ।।**
सांगा सांगा ना...

**लोपामुद्रा** : हां काय मेला हट्ट, असं का कोणी सांगतं, (लाजते)

**महर्षी अगस्त्य** : (अधिकच आसक्त होत पुढे होऊन) देवी जातकयज्ञ आहे. यज्ञाला संकल्प हा हवाच, हो ना?

**लोपामुद्रा** : बरं बाई, पण हे बघा, मला शंभर पुत्र किंवा शंभराच्या बरोबरीचे दहा पुत्र नकोत किंवा मला हजार पुत्रही नकोत. मला हजार पुत्रांच्या बरोबरीचा एकच पुत्र हवा! (स्वप्न पाहात) पुत्र, त्रैलोक्यात आपल्याप्रमाणे श्रेष्ठतम व्हावा, सर्व कला, विद्या आणि पुरुषार्थ संपन्न व्हावा.

**महर्षी अगस्त्य** : (जवळ जात आलिंगन देण्यासाठी जवळ घेत) देवी आपण धन्य आहात, धन्य आहात, धन्य आहात... (तिला जवळ घेण्याचा प्रयत्न, लोपामुद्रा अधिकच लाजताहेत. त्याचवेळी मंचावर अंधार होतो.)

**अंक २ रा प्रवेश ४ था समाप्त**

●●●

## ।। अंक २ रा - प्रवेश ५ वा ।।

(मंच प्रकाशमान होतो; तेव्हा काल आणि अवकाश दोघे गप्पा मारत आहेत. अगस्त्य आश्रमातील अगस्त्य कुटीपुढील दृश्य- पहिल्या अंकाच्या पहिल्या प्रवेशातील दृश्याप्रमाणे)

**काल** : आता अगदी मला मोकळं वाटतंय!

**अवकाश** : होय रे बाबा, एखाद्या ऋषीच्या सेवेत राहाणं म्हणजे फारच

कठीण.

**काल** : त्यात महर्षी अगस्त्यांसारख्या शिवस्वरूप ऋषींच्या बाबतीत तर फारच कठीण. जेव्हढे शांत तेव्हढेच उग्र. असो.

**अवकाश** : अरे ज्याचा शेवट गोड ते सर्वच गोड.

**काल** : पण आता आपल्याला पुन्हा कैलासात केव्हा जायला मिळणार?

**अवकाश** : मी तर आता अगदी उतावीळ झालोय.

**काल** : एक मात्र खरे; की महर्षी अगस्त्यपुत्र इग्मवाह यांच्याशी खेळायला मिळालं की वेळ कसा आनंदात जातो.

**अवकाश** : केव्हढं तेज, जणू प्रत्यक्ष अग्नीच, नव्हे नव्हे प्रत्यक्ष भगवान सूर्यच!

**काल** : शैशवावस्थेतच, त्यांच्या डोळ्यातून, प्रत्यक्ष ज्ञानप्रकाश प्रकाशित होतोसे वाटते.

**अवकाश** : माता अग्निदिव्या तर त्यांच्यात अगदी रमून गेल्या आहेत. महर्षी अगस्त्यही कितीतरी वेळ त्यांच्याशीच खेळत असतात.

**काल** : विवाह संपन्न झाल्यानंतर महर्षी अगस्त्य आणि माता– लोपामुद्रा यांचं वागणं चिंताच निर्माण करणारं होतं. यांचा जातकयज्ञ सफल होईल; असं काही वाटत नव्हतं. दोघे कधी विरक्त होऊन समाधीमग्न होतील कळायचेही नाही!

**अवकाश** : मातांनी महर्षींना ऐश्वर्य संपादन करण्याची अट घातली तेव्हां तर मी हबकलोच. म्हटलं आता काही जातकयज्ञ सफल होत नाही!

**काल** : संकटमालिकांतूनही कधी कधी चांगलं निष्पन्न होतं, ते असं! महर्षींच्या धनसंपादनासाठीच्या संचारामुळे वातापि आणि इल्वलांसारखे दानव नाहीसे झाले. त्यांच्या मायेने गतप्राण झालेले सगळे ऋषी पुन्हा जीवित झाले. जग सुखरूप आणि शांत झाले.

**अवकाश** : महर्षींचे कार्य खरोखरी अवर्णनीयच म्हणावे लागेल. (तेव्हढ्यात नारायण मंत्र जप ऐकिवात येतो. नारदांसमवेत विदर्भ महाराज निमी, राज्ञी श्री दिव्याही येतात. त्यांच्या सोबत महामंत्री सूर्यप्रकाश, राजपुरोहित कौंडिण्य देखील आहेत. या सर्वांना



पाहून गडबडीने दोघेही नारदांना प्रणाम करतात.)

**काल** : प्रणाम मुनिवर, महाराज विदर्भराज, महाराज्ञी आपणा सर्वांचे अगस्ती आश्रमात स्वागत असो. आम्ही आपलीच वाट पाहात होतो.

**महाराज्ञी श्री दिव्या** : कुठे आहे अग्निदिव्या, माझी लोपा? कधी एकदा तिला पाहीन असं झालंय!

**विदर्भराज** : आमचे जामात महर्षी अगस्त्य कोठे मग्न आहेत?

**नारद** : नारायण, नारायण. ते कोठे मग्न असणार? आम्ही जातक सांगणार आहोत म्हणून तयारीत असतील.

**विदर्भराज** : मुनिवर, आम्हीही पौत्र इग्मवाह दृढस्यूतांचे जातक ऐकण्यास उत्सुक आहोत.

**सम्राज्ञी श्री दिव्या** : मुनिवर, मीच त्यांना आपणाकडे घेऊन येते. मला पौत्र इग्मवाहला कधी पाहीन, बाहुत घेऊन, असं झालं आहे!

**नारद** : तथास्तु. (श्री दिव्या आत जाते तोवर महर्षी आणि लोपा बाळ इग्मवाहला घेऊन; येतच असतात. तलम वस्त्रात लपेटलेले बाळ महाराज्ञी श्री दिव्यांच्या हातात देते.)

**विदर्भराज** : मुनिवर श्री दिव्या अगदी आतुर झालेल्या दिसतात.

**नारद** : पुत्रांपेक्षाही पौत्रदर्शन दिव्य असते. नारायण, नारायण. (तेव्हढ्यात महर्षी अगस्त्य, लोपामुद्रा, श्री दिव्याराज्ञी प्रवेशतात. महर्षी अगस्त्य आणि लोपादेवी नारदांना प्रणाम करतात.)

**महर्षी अगस्त्य** : शिवगणहो, मुनिवर आणि पिताश्री आल्याची वार्ता आम्हास नाहीका त्वरित सांगायची?

**नारद** : नारायण, नारायण. त्रिदेवांचे पार्षद, महर्षी अगस्त्य, अगदी अपत्य दर्शनात गढून गेलेले दिसतात. विधीलिला काही औरच आहे म्हणायची! नारायण, नारायण!

**लोपामुद्रा** : नाथ, मुनिवर, मातापिता या सर्वांचे पूजनादी उपचार नाही का करायचे, की येथेच त्यांना तिष्ठत ठेवणार?

**विदर्भराज** : आता आदरातिथ्याचे उपचार नकोत. काय मुनिवर? आम्ही सर्वच दृढस्यूत इग्मवाहंचे जातक ऐकण्यास उत्सुक झालो आहोत. नव्हे का, महर्षी अगस्त्य?

**लोपामुद्रा** : होय तात, मी तर केव्हांपासून मुनिवरांच्या येण्याकडे नेत्रातूर झाले होते.

**नारद** : नारायण, नारायण, हे महर्षी लोपामुद्रामाते, हे महर्षी अगस्त्यां, आपण उभयतां या सृष्टीचे प्रत्यक्ष जातक आहात. आपले सूर्यतेजस्वी सूत, या भविष्याचे निर्माते आहेत, म्हणूनच आम्ही स्वतःच, जातक सांगण्यासाठी आलो आहोत. नारायण, नारायण... (लयबद्धतेने) हे ब्रह्मा विष्णू महेश, त्रिदेवहो! हे महामाया, महाकाली महासरस्वती! समस्त देवांनो, ऋषी, महर्षी, यक्ष, गंधर्व, विद्याधर, मानव, दानव लोकहो - परब्रह्म्याची लीला अगाध!

**प्रेरिले लोपा-अगस्त्य जातक यज्ञास ।**
**सप्तब्रह्ममानस पुत्रा परि विशेष । अगस्त्य पुत्र मम भासे ।।**
**पंचतत्त्वांचे व्यवस्थान । नियमित करण्या निर्मिला अगस्त्य ।**
**कश्यपांसम जातक योजण्यास ।**
**लोपामाता प्रेरित । मातृशक्ती प्रकटती ।।**
**अगस्त्य-लोपा सर्वशक्तीमान । योजून जातकयज्ञास ।**
**प्रकट करिती अद्वितीय । पुत्र यशदायी ।।**
**नारायण, नारायण, मंत्र घोष करी नारद ।**
**नाडी संहिता घोषित करीत । पाहून पुत्र तेजस्वी ।।**
**पुत्र स्वयं अग्निवाहक होई ।**
**दुसरे अगस्त्य प्रकट निर्धारी । ज्ञानसूर्य ।।**
**अगस्त्य-लोपा योगे अवघे विश्व । पृथ्वीलोक आश्वासित ।**
**गोत्र होईल महाथोर । कश्यपांप्रमाणे ।।**
**लोपाकृपे मनुजबालके । आरोग्यपूर्ण होतिल निके ।**
**अंकी घेऊन कौतुके । लोपा निर्भय करी ।।**
**इग्मवाह दृढस्यूत । नामे होईल विख्यात ।**
**क्रतु, पुलह पौलस्त्य अगस्त्यगोत्री सामवी ।।**
**पुत्र होईल दिव्य ऋषी । दुसरा अगस्त्य महाज्ञानी ।**
**अनेक ऋषींना सामावूनी । अगस्त्य गोत्र थोर करी ।।**
**महर्षी अगस्त्य, ब्रह्मकार्य । महर्षी लोपा सृष्टी कार्य ।**



**उत्तराधिकारी होऊन निश्चित । प्रत्यक्ष कार्य अवलंबी ।।**
**महाप्रलया पर्यंत इग्मवाह । अगस्त्य नामे विख्यात ।**
**शास्त्रे, कला, ज्ञान । विश्वभरी प्रसारी ।।**

हे चौदा भूवनांनो, हा दिव्यपुत्र, स्वतः चैतन्यमयी संचार करून, महर्षींचे कार्य दशदिशा पसरवील, यात शंका नाही.! नारायण, नारायण ।।

**लोपामुद्रा** : महामुने, आपणास त्रिवार प्रणाम असो. आपण जातक कथन करून; आम्हास कृतकृत्य केले.

**नारद** : हे महर्षी अगस्त्या त्रिदेव आणि त्रिशक्तीच्या महत्वाकांक्षेप्रमाणे आपण हा जातकयज्ञ सफल केलात, आपण धन्य आहात. (यावेळी सर्वांवर पुष्पवृष्टी होते. याचवेळी श्री दिव्या बाळ लोपांच्या हाती देते आणि भरत वाक्य सुरू होते. याप्रसंगी सर्व पात्रे रंगमंचावर येतात.)

(समारोपाचे वाक्यगान संपवून, पुढील प्रयोगाविषयी सूचना दिली जाते. पात्रपरिचय होतो.)

**अंक २ रा प्रवेश ५ वा समाप्त नाटक समाप्त**

### भरतवाक्याचे गाणे

**भरतभूमीच्या अमृतपुत्रा**
**तपोनिधी साधका**
**अगस्त्या घे घे अभिवंदना ।।ध्रु।।**
**प्रवरातीरी रम्य आश्रमी**
**तुझी लागली इथे समाधी**
**शंका फिटली तुझ्या दर्शनी**
**तपोवनामधी सदैव घुमतो**
**तुझा तपोमहिमा ।।१।।**
**वेदी प्रज्ञा तुझी प्रगटली**
**श्रमी प्रतिष्ठा तू जागविली**
**मनोबले माणसे प्रेरिली**
**सागर तू रे प्राशन केला**

देऊनी आव्हाना ।।२।।
आर्य अनार्या भ्रांती सरली
भारतभूमी अखंड स्फुरली
लोपाने संस्कृती जागविली
तुझी तारका सदैव देते
आम्हा आश्वासना ।।३।।
गुरुकुली तुझ्या दीक्षित आम्ही
हार न जाऊ प्रलय वादळी
आम्ही जगवू अस्मिता अशी
कुदळ तुझी खांद्यावरी घेऊनी
करू ज्ञान साधना ।।४।।
रामप्रभूचे पायिक आम्ही
एकनिष्ठता तुवा शिकविली
प्रवरा अमृती काया न्हाली
शांती, प्रिती अन् संस्कृती रक्षू
पेलून आव्हाना ।।५।।

●●●